अतारांकित प्रश्नोत्तरांची ४८ वी यादी

# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२६**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## धाराशिव जिल्हयातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा उपकेंद्राचे रूपांतर स्वतंत्र विद्यापीठात करण्याबाबत

**(१) १६३५ (२८-०४-२०२५). श्री.कैलास घाडगे पाटील (धाराशिव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव जिल्हयातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा उपकेंद्राचे रूपांतर स्वतंत्र विद्यापीठात करण्याबाबतची मागणी गेल्या अनेक वर्षापासून होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वतंत्र विद्यापीठ निर्मितीसाठी शासनाकडून बच्छाव समिती नेमली होती हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धाराशिव येथील स्वतंत्र विद्यापीठाच्या निर्मितीबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत काय आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (११-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) शासनाकडून समिती नेमण्यात आली नाही. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडून सहसंचालक (मुख्यालय), उच्च शिक्षण, पुणे यांना अभ्यास करून अहवाल सादर करण्याबाबत सूचीत करण्यात आले होते.
(३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या धाराशिव येथील उपकेंद्रामार्फत विद्यार्थ्यांचे पदवी फॉर्म, मायग्रेशन फॉर्म, दुय्यम प्रत, पासिंग फॉर्म, राखीव निकालासंदर्भातील फॉर्म, नाव दुरुस्ती, पासिंग प्रमाणपत्र, पदवी प्रमाणपत्र इत्यादी सेवा देण्यात येतात. विद्यापीठाचे बहुतांश कार्य ऑनलाईन असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## न्हावरे (ता.शिरूर, जि. पुणे) येथील रावसाहेब दादा पवार घोडगंगा सहकारी साखर कारखान्याच्या सुरक्षारक्षकांचे वेतन थकीत असल्याबाबत

**(२) २०११ (०५-०५-२०२५). श्री.ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली आबा कटके (शिरुर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्हावरे (ता.शिरूर, जि. पुणे) येथील रावसाहेब दादा पवार घोडगंगा सहकारी साखर कारखाना गेल्या दोन हंगामापासून बंद असल्याने कारखान्याच्या सुरक्षेसाठी असलेल्या सुरक्षा रक्षकांचे वेतन थकीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कारखान्याचे प्रशासन सुरक्षा रक्षकांना वेळेत वेतन देत नसल्याने संबंधित कामगारांवर उपासमारीची वेळ आली असून काही सुरक्षा रक्षक काम सोडून गेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सुरक्षारक्षकांना वेतन वेळेवर अदा करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (२०-०५-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे. माहे नोव्हेंबर व डिसेंबर,२०२४ चे वेतन थकीत आहे.
(२) हे खरे नाही. सद्य:स्थितीत १८ सुरक्षा रक्षक असल्याचे आणि त्यांना प्रतिमाह प्रति सुरक्षा रक्षक याप्रमाणे माहे सप्टेंबर,२०२४ अखेर पगारापोटी रू.१७,०००/- प्रमाणे व माहे ऑक्टोबर,२०२४ मध्ये प्रत्येकी रू.२२,०००/-, माहे जानेवारी २०२५ मध्ये रू.१०,०००/- व मार्च आणि एप्रिल २०२५ मध्ये रू.९०००/- प्रमाणे आर्थिक उपलब्धतेनुसार ॲडव्हान्स देण्यात आला आहे.
(३) काराखाना गळीत हंगाम सन २०२३-२४ व सन २०२४ मध्ये बंद होता. सुरक्षा रक्षकांचे वेतन विना विलंब देण्याबाबत आयुक्त कार्यालयाकडून कारखान्याला लेखी व तोंडी सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६० चे कलम ८९ (अ) अन्वये तपासणी करण्यात आली आहे. गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये कारखाना सुरू करण्याच्या दृष्टीने कारखान्याने राष्ट्रीय सहकार विकास निगम,नवी दिल्ली यांचेकडून कर्ज मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला असून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रेशीम उद्योगामधील शेतकऱ्यांना मागील अडीच वर्षांपासून तुती लागवडीच्या अनुदानाची रक्कम न मिळाल्याबाबत

**(३) २४५६ (२८-०४-२०२५). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील रेशीम उद्योगासाठी तुती लागवड, स्वखर्चातून शेड उभी करून व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना अडीच वर्षांपासून अनुदानाची कोणतीही रक्कम मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील कळमण येथील शेतकऱ्यांनी मनरेगा योजनेतर्गत माहे जून, २०२३ मध्ये तुतीची लागवड करून मंजुरीसाठी सादर केले असता जिल्हा रेशीम कार्यालयाने दिनांक ५ ऑगस्ट, २०२३ रोजी व त्यादरम्यान लागवडीची पाहणी करून त्यास तांत्रिक मंजूरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उक्त प्रकरणी शेतकऱ्यांचे प्रलंबित अनुदान वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय सावकारे (२४-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) राज्यात नियोजन विभागाच्या दिनांक ३१ मार्च, २०१६ व तसेच सुधारीत मानंकाप्रमाणे दिनांक ६ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेंतर्गत तुती लागवड, जोपासना व कोष उत्पादन ही योजना राबविण्यात येत आहे. सदर योजना राबविण्यासाठी योजनेच्या मार्गदर्शक सुचनानुसार रेशीम संचालनालयाच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत तांत्रिक मान्यता व मार्गदर्शन देण्यात येत असून

तहसिल कार्यालयामार्फत प्रशासकीय मान्यता देवून कार्यारंभ आदेश देण्यात येत आहे. त्यामुळे अनुदान अदा करण्यासाठी कार्यान्वयन यंत्रणा महसूल विभाग असून त्यांच्यामार्फत रेशीम शेतकऱ्यांना अकुशल व कुशल कामाची रक्कम अदा करण्यात येते. सदरहू प्रकरणी मौजे कळमण जि.सोलापूर येथील ४ शेतकऱ्यांनी मनरेगा योजनेअंतर्गत तुतीची लागवड केलेली असून तुती लागवडीचे कामकाजानुसार त्यांना अकुशल कामकाजाची संपूर्ण रक्कम यापूर्वीच अदा करण्यात आलेली आहे. तथापि त्यांच्या कुशल अनुदानाबाबतची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

१. श्री. वैजनाथ भैरु कांबळे, श्री दत्तात्रय विश्वनाथ लंबे या रेशीम शेतकऱ्यांची मनरेगा अंतर्गत तुती रोपाचे रक्कम रुपये १८००० प्रमाणे कुशल बिल दिनांक २३.०६.२०२५ रोजी नरेगा संकेतस्थळावर अपलोड करुन FTO तयार करण्यात आले होते. परंतु केंद्र शासनाच्या सुचने प्रमाणे नविन स्पर्श प्रणाली सुरु झाल्यामूळे जूने FTO रदद करण्यात येऊन नवीन FTO तयार करता आलेले आहे. तथापि कुशल निधी उपलब्ध झालेले नसल्याने रक्कम अदा करण्यात आलेली नाही. नरेगा संकेतस्थळावर निधी उपलब्ध होताच संबधीतांना रक्कम अदा करण्यात येईल

२. श्री. पांडूरंग प्रकाश डोके या रेशीम शेतक-यांनी यापूर्वी पाण्याअभावी तुती लागवड कमी केली असून यांचा पंचनामा तहसिल कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे.

३. श्री. राजाराम दत्तू पवार या रेशीम शेतक-यांनी त्याची शेतजमीन विक्री केल्याने त्याची तुती लागवड कमी झाल्याने पंचनामा करुन सदर पंचनामा तहसिल कार्यालयास सादर करणेत आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अनुदानित शाळांमध्ये बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली कार्यान्वित करण्याबाबत

**(४) २६०० (०५-०५-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण विभागाच्या वतीने दिनांक १ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या दरम्यान टप्पा तत्त्वावर शाळांना अनुदान देताना शाळेतील विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची बायोमेट्रिक प्रणाली अथवा चेहरा ओळखप्रणालीद्वारे उपस्थिती अनिवार्य करण्यास सहा महिन्यांची मुदत देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे डिसेंबर, २०२४ पर्यंत राज्यातील अनुक्रमे २० टक्के, ४० टक्के, ६० टक्के अनुदानावरील शाळांनी बायोमेट्रिक प्रणालीच्या अटींची पूर्तता केली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक अनुदानित शाळांमध्ये बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली कार्यान्वित नसल्याने विज्ञान शाखेतील अकरावी व बारावीचे विद्यार्थी हे अनुदानित शाळेत नावाला प्रवेश घेत भरमसाठ पैसे देऊन नीट व जे. ई. ई चे खाजगी वर्ग व शिकवण्यांद्वारे शाळेत शिक्षण घेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील अनुदानित शाळेत ७५ टक्के उपस्थितीची काटेकोरपणे अंमलबजावणी होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, तसेच राज्यातील खाजगी शिकवणी वर्गावर लगाम लावण्याकरिता अनूक्रमे २०, ४०, ६० टक्के अनुदान प्राप्त करणाऱ्या शाळांची तपासणी करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२९-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.
(४) शासन निर्णय दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२३ मध्ये अनुदान पात्र शाळांना प्रत्यक्ष अनुदान अदा करण्यापूर्वी सदर शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती "बायोमेट्रिक" प्रणाली अथवा चेहरा ओळख (Face Recognition) प्रणालीद्वारे नोंदविण्यात येत असल्याची खात्री करावी. सदर अट पूर्ण करण्याकरीता सर्व अंशत: अनुदानित शाळांना ६ महिन्यांची मुदत देण्यात यावी, असे नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार उक्त शासन निर्णयात नमूद अटी व शर्तींची पूर्तता झाल्यानंतरच अनुदान देय असल्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यात पुरवठा विभागामार्फत रास्त धान्य दुकानात धान्य पुरवठा कमी पुरवला जात असल्याबाबत

**(५) ३००९ (२८-०४-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यात पुरवठा विभागामार्फत रास्तधान्य दुकानदारांना धान्याचा कमी पुरवठा केला जात असल्यामुळे १०० टक्के लाभार्थ्यांना धान्य मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ रोजी मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांच्या शून्य नियोजन कारभारामुळे धान्यपुरवठा वितरित होत नसल्यामुळे लाभार्थ्यांना धान्यापासून वंचित रहावे लागत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पनवेल तालुक्यात सन २०२३ - २०२४ व सन २०२४ - २०२५ या आर्थिक वर्षात शासनाकडून लाभार्थ्यांना किती धान्य पुरवठा वितरित केला आहे, तसेच वंचित लाभार्थ्यांना धान्य मिळण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२६-०५-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) सन २०२३-२४ व सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षांमध्ये पनवेल तालुक्यास मंजूर नियतन व लाभार्थ्यांना अन्नधान्याचे करण्यात आलेले वाटप याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | योजना | अन्नधान्ये | मंजूर नियतन (क्विंटल) | वाटप (क्विंटल) |
|---|---|---|---|---|
| २०२३-२४ | अंत्योदय | गहू | ७२९२.६२ | ७१२०.०७ |
| २०२३-२४ | अंत्योदय | तांदुळ | १८२४७.४ | १७७९८.०५ |
| २०२३-२४ | प्राधान्य गट | गहू | ३५६३१.१५ | ३३८७८.२८ |
| २०२३-२४ | प्राधान्य गट | तांदुळ | १०५०१८.०२ | १००९६७.९० |
| २०२४-२५ | अंत्योदय | गहू | ८२३९.१२ | ८१४७.९६ |
| २०२४-२५ | अंत्योदय | तांदुळ | १७१२२.४७ | १६७४३.४५ |
| २०२४-२५ | प्राधान्य गट | गहू | ३८७४०.८७ | ३६०२१.१६ |
| २०२४-२५ | प्राधान्य गट | तांदुळ | १०४७१५.८ | १००९७७.२ |

NFSA अंतर्गत वितरीत अन्नधान्याचे राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ मधील कार्यपद्धतीनुसार, पात्र अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांकरीता विहित वेळेत वाटप करणेबाबत तसेच यासंदर्भात शासनस्तरावरुन वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबतच्या सूचना सर्व जिल्ह्यांना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विनाअनुदानित शाळांमधील मान्यता प्राप्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनुदानित शाळांमध्ये बदली संदर्भातील शासन धोरणाबाबत**

**(६) ३१९८ (०५-०५-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने विनाअनुदानित शाळांतील शिक्षकांना अंशत: किंवा १०० टक्के अनुदानित शाळांमध्ये बदलीची परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विनाअनुदानित शिक्षकेतर पदास शासनाची मान्यता असून देखील त्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी विनाअनुदानित वरुन अंशत: किंवा १०० टक्के अनुदानित वरील बदलीसंदर्भात कोणतेही धोरण निश्चित करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षकेतर कर्मचारी अनेक वर्षे कमी वेतन व विनावेतन काम करत असून त्यांच्यासमोर आर्थिक समस्या निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन मान्यताप्राप्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बदल्या विनाअनुदानित वरुन अंशत: किंवा १०० टक्के अनुदानित शाळेकडे करण्यासाठी शासनाने यासंदर्भात कोणते धोरण तयार केले आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१८-०५-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम ४१-अ नुसार शिक्षकांची विनाअनुदानित वरुन अंशत: अनुदानित व १०० टक्के अनुदानित पदावर बदली करणेबाबतची तरतूद आहे. त्यानुसार शिक्षकेत्तर कर्मचारी पदावर कार्यरत कर्मचारी यांना देखील याप्रमाणे संधी प्राप्त व्हावी याअनुषंगाने शासन अधिसूचना दिनांक ०६.०४.२०२१ अन्वये नियमावली १९८१ मध्ये नियम ४१-ब दाखल करणेबाबतच्या नियमाचा मसुदा प्रसिध्द करण्यात आलेला आहे. याअनुषंगाने प्राप्त हरकती व सूचना विचारात घेऊन अंतिम नियम महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करण्याबाबत यथोचित निर्णय घेण्याचे नियोजित आहे.

---

**राज्यातील शाळांच्या पायाभूत सोई-सुविधा आणि शैक्षणिक गरजा पुरविणेबाबत**

**(७) ३२६० (०५-०५-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.महेश सावंत (माहिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शाळांमध्ये भौतिक सुविधा, संगणक प्रणालीचा वापर वाढविणे, शिक्षक व मुख्याध्यापकांच्या नियमित प्रशिक्षण व कार्यशाळा घेणे आवश्यक आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षक व शिक्षकेतर संघटनांनी शिक्षकांचे वेतनेतर अनुदान वाढविणे, प्रत्येक शाळेत कला व

क्रीडा शिक्षक नेमणे, सीबीएससी पॅटर्न लागू करणे, वेतन वेळेत मिळावे अशा अनेक शिक्षक व शिक्षकेतर संघटनांनी शासनाकडे मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सुचनांच्या आधारे शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीसाठी तसेच विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०५-०६-२०२६) :** (१), (२) व (३) राज्यांतील शाळांमध्ये भौतिक सुविधा व संगणक आधारीत अध्यापन- अध्ययन साहित्य यासाठी समग्र शिक्षा, पी.एम. श्री. शाळा, स्टार्स प्रकल्प या सारख्या केंद्र पुरस्कृत योजनामधून प्राप्त निधीचा वापर करण्यात येतो.

राज्य पुरस्कृत डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत देखील शाळांना भौतिक सुविधा पुरविण्यात येतात.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषदत तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या मार्फत शिक्षक व मुख्याध्यापकांना उद्देशनिहाय व प्रसंगानुरूप प्रशिक्षण व उजळणी प्रशिक्षण नियमितपणे दिले जाते.

दिनांक १५/०३/२०२४ रोजीच्या संच मान्यतेच्या शासन निर्णयान्वये कला व क्रिडा व कार्यानुभव या विषयांच्या शिक्षकांचा संच मान्यतेत समावेश करण्यात आला आहे.

शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी - २०२५ या परिक्षेतील गुणांच्या आधारे सदर विषयातील शिक्षकांची नियुक्तीसाठी शिफारस केली जाणार आहे.

अध्ययन फलनिष्पत्ती व संपादणूकी पातळीतील वाढविण्यासाठी नियतकालीक मूल्यांकन चाचण्या, शिक्षक व प्रशिक्षण, ब्रिज कोर्स, अध्यापन अध्ययन साहित्याचा पुरवठा, गणित व विज्ञान समृद्धी कार्यक्रम इत्यादी अनेक उपक्रम राबविण्यात येतात.

जिल्हा नियोजन समिती, मनरेगा, सेस निधी, क्रीडा विभाग निधी, स्थानिक विकास निधी, सेवाभावी संस्था, समाज कल्याण, आदिवासी विकास विभाग, सीएसआर, गौणखणिज, लोकसहभाग, जलजीवन मिशन, १४ वा / १५ वा वित्त आयोग इत्यादी राज्य शासनाच्या विविध विभागांच्या योजनांव्दारे कार्यान्वित उपाययोजनांचा शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील स्थानिक गरजानुसार अपेक्षित पायाभूतसुविधांच्या विकासाकरीता दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार सुचना देण्यात आल्या आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये प्राचार्यांची नेमणूक करण्याबाबत

**(८) ३६२२ (०५-०५-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या ११६६ महाविद्यालयांपैकी ५१३ तसेच ४६ विधी महाविद्यालयांपैकी १८ महाविद्यालय प्राचार्यविना सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, पुणे शहरातील ४३ अनुदानित महाविद्यालयांपैकी १८ तरे ४६ विधी महाविद्यालयांपैकी २२

महाविद्यालयात प्रभारी प्राचार्यांमार्फत कारभार केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्राचार्यविना महाविद्यालय सुरू असल्याकारणाने शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे, एन. ए. पी ची अंमलबजावणी करणे तसेच सत्र परीक्षा पारदर्शकपणे पार पाडणे व इतर शैक्षणिक व प्रशासकीय सेवा तसेच महाविद्यालय मधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षितता सोयीसुविधा, शिस्त व परीक्षांचे पारदर्शकपणे आयोजनात मोठ्या प्रमाणावर अडचणी निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सर्व महाविद्यालयात व विधी महाविद्यालयातील कायमस्वरूपी प्राचार्यांची नेमणूक करण्याबाबत शासन स्तरावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०८-०६-२०२६) :** (१) अशंत: खरे आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित एकुण अनुदानित १६६, विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित ४४८ अशी एकुण ६१४ महाविद्यालये आहेत. यापैकी १९६ महाविद्यालयामध्ये नियमित प्राचार्य आणि १३२ महाविद्यालयामध्ये प्रभारी प्राचार्य कार्यरत आहेत. उर्वरित २८६ महाविद्यालयाकडून प्राचार्य पदभरतीची कार्यवाही सूरु आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित एकुण ६३ विधी महाविद्यालये असून ०७ महाविद्यालयांमध्ये नियमित प्राचार्य आणि १६ विधी महाविद्यालयांमध्ये प्रभारी प्राचार्य कार्यरत आहेत. उर्वरित ४० महाविद्यालयांमध्ये नियमित प्राचार्य नियुक्त करणेसंदर्भात दिनांक ०१/०९/२०२३, दिनांक ०५/१२/२०२३ दिनांक ०३/०३/२०२५ अन्वये कळविण्यात आले आहे.

(२) अशंत: खरे आहे.

(अ) पुणे शहरामध्ये एकूण ५१ अनुदानित महाविद्यालये आहेत. त्यापैकी ३४ महाविद्यालयामध्ये नियमित प्राचार्य आणि १७ महाविद्यालयांमध्ये प्रभारी प्राचार्य आहेत.

(ब) पुणे शहरामध्ये एकूण ०४ अनुदानित विधी महाविद्यालये असून त्यापैकी ०३ महाविद्यालयामध्ये नियमित प्राचार्य व ०१ महाविद्यालयामध्ये प्रभारी प्राचार्य कार्यरत आहेत.

(३) व (४) हे खरे नाही.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील प्राचार्य पदभरतीस शासन परिपत्रक दिनांक २३/०३/२०२१ व शासन निर्णय दिनांक १२/११/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार संस्था/महाविद्यालय स्तरावर प्राचार्य पदभरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक १५/०३/२०१२ नुसार महाविद्यालयातील पुर्णवेळ प्राचार्य पद रिक्त झाल्यास संबंधित महाविद्यालयातील अर्हताधारक अध्यापकांना विद्यापीठाच्या मान्यतेने प्राचार्य पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात येतो. त्यामुळे महाविद्यालयातील शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, महाविद्यालयामध्ये एन.ई.पी. ची अंमलबजावणी करणे तसेच, सत्र परिक्षा पारदर्शकपणे पार पाडणे व इतर शैक्षणिक, प्रशासकीय सेवा तसेच विद्यार्थांची सुरक्षितता, शिस्त व परिक्षाचे आयोजनाबाबत अडचणी निर्माण होत नाहीत.

तसेच, पुर्णवेळ प्राचार्य पद नेमणूक न केल्यास अशा महाविद्यालयांचे असंलग्निकरण करणेबाबत संबंधित विद्यापीठास शासन मान्यतेने प्रस्तावित करण्यात येईल आणि याबाबत होणाऱ्या शैक्षणिक नुकसानास संबंधित व्यवस्थापन जबाबदार राहील, असे उच्च शिक्षण संचालनालयाच्या दिनांक ०५/१०/२०२१ रोजीच्या परिपत्रकाद्वारे संबंधित संस्था/ महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पारोळा (जि.जळगांव) कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव यांना सेवानिवृत्तीनंतरच्या उपदानाची रक्कम अदा करणेबाबत

**(९) ३८६४ (२९-०४-२०२५). श्री.अमोल पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा (जि. जळगाव) कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव व लेखापाल यांनी दिनांक ३१ मे, २०२३ रोजी सेवानिवृत झाल्यानंतर बाजार समितीचे लेखापाल, श्री.अरुण पाटील यांना सेवानिवृत्ती नंतरची ग्रॅज्युएटी (उपदान), अर्जित रजेचा पगार व गटविमा रक्कम अदा करण्यात आली, परंतु सचिव, श्री.रमेश चौधरी यांची सेवानिवृतीनंतरची त्यांच्या हक्काची रक्कम गेल्या वर्षभरापासून संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक देण्यास टाळाटाळ केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.रमेश चौधरी, सचिव यांची ग्रॅज्युएटी (उपदान) रक्कम, गटविमा आदी रक्कम एल.आय.सी ऑफ इंडिया, नाशिक यांचेकडून पारोळा बाजार समितीकडे जमा करण्यात आली असून देखील संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक त्यांना त्या रक्कमेपासून वंचित ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत दिनांक १ जून, २०२३ पासून ते विलंबाचा कालावधीपर्यंत व्याजासह रक्कम अदा करण्याची मागणी श्री. रमेश चौधरी, सेवानिवृत सचिव, पारोळा कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून पणन मंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०२४ मध्ये लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने श्री.चौधरी यांना मिळणाऱ्या सेवानिवृत्तीच्या उपदानापासून वंचित ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२४-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

तत्कालीन लोकप्रतिनिधी, माजी विधानसभा सदस्य यांनी श्री.रमेश चौधरी यांच्या सेवानिवृत्तीनंतरच्या देय रक्कमा अदा करण्याबाबत मागणी केली होती.

(४) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ च्या कलम ४० अन्वये चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जैन समाजासाठी "जैन समाज अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ व्यवसाय कर्ज योजना" सुरु करण्याबाबत

**(१०) ३८९० (२९-०४-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.प्रविण विरभद्रया स्वामी (सर) (उमरगा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जैन समाजासाठी जैन समाज अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय माहे ऑक्टोंबर, २०२४ मध्ये घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामंडळाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांसाठी आर्थिक तरतूद न झाल्याने माहे जानेवारी, २०२५ अखेरपर्यंत महामंडळाच्या वतीने एकाही लाभार्थ्याला आर्थिक तरतूद वितरित

करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सांगली जिल्ह्यातील जैन समाजासाठी स्थापन केलेल्या जैन समाज अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाची व्यवसाय कर्ज योजना गेली सहा महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू योजना बंद झाल्याने जैन समाजातील नवोदित उद्योजकांना उद्योग-व्यवसाय सुरु करणे अडचणीचे ठरत असल्याने सदरहू योजना तात्काळ सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (२९-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे, अंशत: खरे आहे.

दिनांक ०४/१०/२०२४ अन्वये "जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळ" स्थापन करण्यात आले आहे. महामंडळाचे भागभांडवल, योजना व प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी दिनांक २५/०९/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये तीन नवीन लेखाशिर्ष उघडण्यात आले आहेत. डिसेंबर, २०२५ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये सदर लेखाशिर्षाखाली पुरवणी मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर पुरवणी मागणी प्रस्ताव मंजूर करण्यात आला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

उद्देश लेखाशिर्ष अर्थसंकल्पीत निधी (रू कोटी)
महामंडळ प्रशासन खर्च २२२५ G ५३७ ०.४०
योजनांसाठी अनुदान २२२५ G ५४६ १०.००
भागभांडवल ४२२५ २१८८ ५.००

महामंडळासाठी पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेला निधी प्राप्त करून घेण्यासाठी वित्त विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

महामंडळाचे काम सुरळीतपणे सुरू होईपर्यत तसेच मंजूर करण्यात आलेल्या योजनांसाठी शासनामार्फत निधी उपलब्ध होईपर्यत जैन समाजातील अर्जदारांना मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांतर्गत कर्ज उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे.
(४) जैन समाज अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची व्यवसाय कर्ज योजना तात्काळ सुरू करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचा संदर्भ या कार्यासनात आढळून येत नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठामध्ये शोध प्रबंध लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता निधी व सोई सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(११) ४२८४ (२९-०४-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठामध्ये शोध प्रबंध लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता अतिरिक्त निधी व सोई सुविधांची उपलब्धता निर्माण करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विद्यार्थ्यांना अतिरिक्त निधी व सोयी-सुविधा मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१०-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) शासनामार्फत पीएच.डी. संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध फेलोशिप योजनांद्वारे आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येते. सदर फेलोशिपमध्ये मासिक अर्थसहाय्य (Monthly Fellowship), संशोधन साहित्य व क्षेत्रीय कार्यासाठी संशोधन अनुदान (Research Grant), शैक्षणिक उपक्रम व संमेलनांसाठी आकस्मिक भत्ता (Contingency Allowance) तसेच शोधप्रबंध छपाई व सादरीकरणासाठी सहाय्य (Thesis Support) यांचा समावेश असतो. तसेच केंद्र शासनाच्या विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत (UGC) जेआरएफ (JRF) व एसआरएफ (SRF) फेलोशिपद्वारे पात्र संशोधकांना मासिक विद्यावेतन, घरभाडे भत्ता, वैद्यकीय लाभ व महागाई भत्ता उपलब्ध करून देण्यात येतो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कडेगाव (जि.सांगली) तालुक्यातील सेवा सोसायट्यांमधील सचिवांच्या कमतरतेमुळे होणाऱ्या कार्यातील संथगती व नागरिकांच्या गैरसोयीबाबत

**(१२) ४७५९ (०५-०५-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कडेगांव (जि.सांगली) तालुक्यातील ६४ सेवा सोसायटयांचा कार्यभार केवळ ३१ सचिवांवर अवलंबून असून यामध्ये केडरमार्फत १६, तर संस्थानियुक्त १५ सचिव काम करत आहेत, तसेच संस्थानियुक्त १५ सचिव काम करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुक्यात केडरच्या एका सचिवावर ३ सोसायटयांची जबाबदारी असून सचिवांच्या रिक्त जागा भरल्या जात नसल्याने गावा-गावातील सर्व सोसायटयांचे काम संथगतीने सुरु असल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सचिवांची रिक्त पदे भरण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (१७-०६-२०२६) :** (१), (२) व (३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन आदेश दिनांक ०५/०८/२०२५ अन्वये प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था तथा विविध कार्यकारी सहकारी संस्थांमध्ये सचिवांची नामनिर्देशनाद्वारे अथवा सरळसेवेद्वारे नेमणुक करण्याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

सदर शासन आदेशातील सूचनांची अंमलबजावणी जिल्हा उपनिबंधक, सांगली व जिल्हा देखरेख सहकारी संस्था, सांगली यांच्या स्तरावरुन करण्यात आली असून सद्यस्थितीत कडेगाव तालुक्यामध्ये केडर सचिवांची संख्या ३० आहे. त्यापैकी मुदतवाढ दिलेले २ सचिव आहेत. या ३० सचिवांवर कडेगांव (जि.सांगली) तालुक्यातील ६४ संस्थांचा पदभार आहे.

तसेच केडर नियुक्त सचिवांकडील मोठ्या संस्थांकडे लिपिक व इतर कर्मचारी यांची नियुक्ती संस्थेकडून करण्यात आलेली असल्याने संस्थेचे दैनंदिन कामकाज व्यवस्थीतपणे चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील भांडुप-कांजूरमार्ग परिसरात खेळासाठी हिंन्दुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्टेडियम उभारणेबाबत**

**(१३) ४९०२ (०५-०५-२०२५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगर जिल्ह्यातील भांडुप-कांजूरमार्ग येथे १० ते १५ लाख वस्ती असलेल्या सदर भागात स्टेडियम किंवा खेळाचे एकही मैदान नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वानखेडे, ब्रेबॉर्न क्रिकेट मैदानाच्या धर्तीवर डंपिंग ग्राऊंडवर हिन्दुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्टेडियम बनविण्यात यावे या मागणीसाठी भांडुप (प.) येथील लोकप्रतिनिधी तसेच स्थानिक नागरिकांनी मा.उप मुख्यमंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (२६-०५-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) याबाबत क्रीडा विभागास निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शुल्क नियामक प्राधिकरणाचे कामकाज पारदर्शक पध्दतीने करण्याबाबत**

**(१४) ५१३४ (०५-०५-२०२५). श्री.करण देवतळे (वरोरा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ च्या तरतुदींनुसार शुल्क नियामक प्राधिकरणाचे काम होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शुल्क नियामक प्राधिकरणाद्वारे ज्या शीर्षांखाली शुल्क आकारले जाईल अशा विविध शीर्षांचा उल्लेख प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर दिसत नाही, तसेच कलम २० अंतर्गत प्राधिकरणाद्वारे अद्यापपर्यंत किती जणांवर कारवाई करण्यात आली आहे, ही बाब स्पष्ट होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शुल्क नियामक प्राधिकरणामध्ये कार्यरत असणारे बहुतेक सर्व कर्मचारी हे पूर्णवेळ कायमस्वरुपी कर्मचारी नसून हे कर्मचारी त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर प्राधिकरणामध्ये काम करीत असल्याचे दिसून येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शुल्क नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळाच्या दुरवस्थेची दखल घेऊन हे संकेतस्थळ अधिक माहितीपूर्ण, अद्ययावत करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१०-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतुदींनुसार शुल्क नियामक प्राधिकरणाचे कामकाज सुरु आहे.
(२) हे खरे नाही. शुल्क नियामक प्राधिकरणाद्वारे ज्या शीर्षांखाली शुल्क आकारले जाईल अशा विविध शीर्षांचा उल्लेख प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित केला आहे. तसेच, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम २० अन्वये अद्यापपर्यंत ९ महाविद्यालयांवर कारवाई करण्यात आली आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) व (५) शुल्क नियामक प्राधिकरणाचे कामकाज मुक्त व पारदर्शक पध्दतीने होण्याच्या अनुषंगाने संकेतस्थळ अद्ययावत ठेवण्याच्या सूचना शुल्क नियामक प्राधिकरणास दिनांक ०२.०१.२०२४ रोजीच्या शासनपत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत. शुल्क नियामक प्राधिकरणाकडून कामकाजानुरूप वेळोवेळी संकेतस्थळ अद्ययावत करण्याची कार्यवाही करण्यात येत असते.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यातील वक्फ इनामी जमिनीचा केंद्रीय व राज्यस्तरीय सर्व्हे करण्याबाबत**

**(१५) ५७७८ (०५-०५-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यात वक्फ जमिनीचा केंद्रीय स्तरावर सर्व्हे करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बीड जिल्ह्यात वक्फ संस्थेच्या रेकॉर्ड नुसार इनामी जमीन राजपत्रात १७,००० एकर असून बीड जिल्ह्याच्या महसूल खात्यात २४,००० एकर इनामी जमीन असल्याचे महसूल विभाग छत्रपती संभाजीनगर मध्ये नोंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महसूल रेकॉर्ड आणि वक्फ रेकॉर्ड यांची एकत्रित सर्व्हे करण्याकरिता शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (२४-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही. बीड जिल्हयात वक्फ जमिनीचा केंद्रीय स्तरावर सर्व्हे करण्यात आलेला नाही.
(२) महाराष्ट्र शासन राजपत्रानुसार बीड जिल्हयात वक्फ मालमत्तांची संख्या जवळपास १७००० एकर इतकी आहे. तर महसूल अभिलेख्यानुसार बीड जिल्हयातील इनाम जमिनीचे (वक्फ आणि वक्फ नसलेल्या जमीनीचे) क्षेत्र २७१५१.६५२५ एकर आहे.
(३) उम्मीद अधिनियमातील सुधारित तरतुदीनुसार वक्फ मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याची जबाबदारी ही संबंधित जिल्हाधिकारी यांची आहे. त्यामुळे भविष्यातील सर्व सर्वेक्षण हे महसूल अभिलेख व वक्फ अभिलेख याची तपासणी करुनच होणार आहे. राज्य शासनाने राज्यातील सर्व वक्फ मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ऊसतोड कामगारांच्या विविध समस्यांबाबत**

**(१६) ६५८७ (०५-०५-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऊसतोड कामगारांच्या मुलांचे शिक्षण, कारखाना परिसरात घरकुलांच्या धर्तीवर घरे, शेतावर निवासासाठी तंबू, प्रत्यक्ष कार्यक्षेत्राच्या ठिकाणी स्वच्छतागृह, कामगारांच्या मुलांसाठी स्वतंत्र वसतीगृह, हंगामी शाळा, आरोग्य तपासणीची व्यवस्था, स्थलांतरित ठिकाणी शिधापत्रिकेवर स्वस्त धान्य मिळण्याची व्यवस्था इत्यादी विविध सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या सुचना समाजकल्याण, सहकार आयुक्तांनी संबंधितांना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त सर्व सुचना केवळ कागदावरच असून त्याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे ऊसतोड कामगार, महिला कामगार व त्यांच्या मुलांची मोठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने ऊसतोड कामगारांना सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (१९-०६-२०२६) :** (१), (२) व (३) राज्यातील साखर कारखान्यांवर ऊसतोडणीचे काम करणाऱ्या मजुरांसाठी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी साखर आयुक्तालयामार्फत दिनांक २३/०७/२०१९, दिनांक २०/०६/२०२३ व दिनांक २१/११/२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व साखर कारखान्यांना सूचना निर्गमित केल्या आहेत. यामध्ये ऊसतोड कामगारांसाठी विमा योजना, निवास व्यवस्था, स्वच्छतागृहे, शुद्ध पाणी, नियमित वैद्यकीय तपासणी, लसीकरण, महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिन्स, मुलांसाठी शिक्षण सुविधा, महिला मजुरांसाठी समुपदेशन समिती यांचा समावेश आहे.

तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारितील लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळामार्फत ऊस तोडणी मजुरांचा विमा उतरविणे, त्यांचे पाल्यांच्या शैक्षणिक सुविधेसाठी वसतिगृहे उभारणे, ऊसतोड मजूरांची नोंदणी करून त्यांना ओळखपत्र देणे तसेच महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असलेले सर्व ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम त्यांचे झोपडी व बैलजोडी यांच्याकरिता "गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजना" आदी विविध कल्याणकारी योजना राबविणेबाबत कार्यवाही करण्यात येते. त्याचप्रमाणे सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक २७ एप्रिल,२०२६ च्या शासन निर्णयान्वये गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडामार्फत राज्यातील ऊसतोड कामगारांना कोयता, सेफ्टी गमबूट, हातमोजे, सोलापूरी चादर, ब्लँकेट व टेंट (तंबू) इत्यादी साहित्य तसेच महिला ऊसतोड कामगारांना सॅनिटरी नॅपकीन वितरीत करण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील संगमनेर आणि अकोले (जि.अहिल्यानगर) तालुक्यांच्या ठिकाणी न्यायालयीन कामकाजासाठी "सहकार न्यायालय" स्थापित करण्याच्या मागणीबाबत**

**(१७) ७०९८ (१८-०७-२०२५). श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील संगमनेर आणि अकोले (जि.अहिल्यानगर) तालुक्यांच्या ठिकाणी जनतेला सोयीस्कर व्हावे या उद्देशाने, सहकारी संस्थांच्या न्यायालयीन कामकाजासाठी "सहकार न्यायालय" स्थापित करण्याची मागणी

विविध सामाजिक, सहकारी संस्थाचे पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधींनी सहकार मंत्री यांच्याकडे माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या कोपरगाव येथे असलेले “सहकार न्यायालय” संगमनेर आणि अकोले तालुक्यांतील सहकारी संस्थांच्या न्यायालयीन कामकाजासाठी दुरच्या ठिकाणी जावे लागत असल्याने स्थानिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या भागातील सहकार क्षेत्रातील समस्यांचे निराकरण जलद गतीने होण्याच्या दृष्टीने संगमनेर आणि अकोले तालुक्यांसाठी “सहकार न्यायालय” स्थापित करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (०९-०६-२०२६) :** (१) होय.
(२) होय.
(३) याबाबत सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा., पुणे यांचेकडून शासनास अहवाल प्राप्त झाला असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात उष्णतेच्या लाटांविरोधात दीर्घकालीन उपाययोजना करण्याबाबत

**(१८) ७१११ (०९-१०-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेकवेळा तापमान ४३ अंशांवर गेल्यामुळे उष्णतेच्या लाटांचा प्रकोप वाढला असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ‘एसएफसी’ या संस्थेच्या अभ्यासानुसार जागतिक तापमानवाढीच्या पार्श्वभूमीवर मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, जालना यांसारख्या शहरांमध्ये उष्णतेच्या लाटांविरोधात संरचनात्मक पातळीवर कोणतीही अंमलबजावणी झाली नसल्यामुळे नागरिकांचे आरोग्य, दैनंदिन उपजीविका व उत्पादकता यावर परिणाम झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हवामान बदलाचा सामना करण्यासाठी ‘हिट वेव्ह ॲक्शन प्लान’, ‘हवामान सहनक्षम आराखडा’ यांसारख्या जागतिक उपाययोजनांचा अवलंब न करणे आणि केंद्र व राज्य पातळीवर समन्वयाचा अभाव असणे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, उन्हाळ्याच्या दिवसात उष्णतेचा प्रादुर्भाव झाल्याने देवरुख (ता. संगमेश्वर) येथील परशुरामवाडी जिल्हा परिषद शाळेतील मियावाकी पद्धतीचा प्रयोग यशस्वी ठरला असून, त्यातून तापमानात सुमारे २ अंश सेल्सिअस घट झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने नागरी आरोग्य रचना, सार्वजनिक प्रवासी व्यवस्थापन, पाणीपुरवठा, वीजपुरवठा व कामकाजाचे वेळापत्रक इत्यादी बाबींचा समावेश असलेली दीर्घकालीन कार्ययोजना आखण्याकरीता तसेच मियावाकी पद्धतीचा अवलंब करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२१-०४-२०२६) :**(१) (२) व (३) अंशत: खरे आहे

केंद्र शासनाच्या निर्देशास अनुसरुन सर्व उष्माघात प्रवण जिल्हयांकडून “उष्मालाट कृती आराखडे” तयार

करण्यात आले आहेत. आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून "महाराष्ट्र राज्य उष्मालाट कृती आराखडा" सन २०२४ मध्ये प्रसिध्द करण्यात आला आहे.
(४) होय.
(५) शासनाकडून उष्मालाट प्रभावित क्षेत्रांसाठी पुर्व सुचना देण्यात येते. या कालावधीत नागरिकांनी काय खबरदारी घ्यावी याबाबतची माहिती विविध प्रसार माध्यमांमार्फत तसेच राज्य आपत्ती प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात येते. आपत्ती व्यवस्थापन प्रभागाच्या दिनांक २३ मार्च, २०२३ च्या शासन परिपत्रकान्वये उन्हाळी हंमागातील उष्मालाटेमुळे उद्भवणाऱ्या मानव, पशु प्राणी व शेती पिकांवर होणारे दुष्परिणाम टाळण्याच्या दृष्टीने जिल्हा स्तरावर विविध विभागांनी करावयाच्या उपाययोजनासंदर्भात सर्वसाधारण सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

---

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ विना अनुदानित अभ्यासक्रमांना शासन अनुदान मिळविण्याबाबत

**(१९) ७३७९ (१९-०८-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात सन २०१७-१८ मध्ये तत्कालीन कुलगुरू डॉ.मुरलीधर चांदेकर यांच्या पुढाकाराने इतिहास, राज्यशास्त्र, वाणिज्य व अर्थशास्त्र या चार पदव्युत्तर शाखा स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सुरू करण्यात आल्या होत्या, मात्र शासनस्तरावर अनुदान मिळवण्यासाठी प्रयत्न न झाल्यामुळे विद्यापीठावर आर्थिक भार वाढल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आर्थिक भार सहन न झाल्यामुळे चारही पदव्युत्तर अभ्यासक्रम विद्यापीठ शासनाने बंद करण्याचा निर्णय घेतला असून त्यामुळे शैक्षणिक सुविधा असूनही विद्यार्थी वंचित राहत असल्याचे दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यापीठ प्रशासनाने अभ्यासक्रम स्वयंअर्थसहाय्यित असल्याने त्यांना बंद करण्यासाठी शासनाची पूर्व परवानगी आवश्यक नसल्याचे स्पष्टीकरण दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या मंजुरीनंतरच अभ्यासक्रम बंद करण्यात आल्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, अभ्यासक्रम बंद होणे ही गंभीर बाब असून यासंदर्भात सदर विद्यापीठ प्रशासनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
सदरील सर्व अभ्यासक्रम हे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या अनुदानित तसेच विना अनुदानित काही महाविद्यालयांमध्ये देखिल उपलब्ध आहेत. सदर अभ्यासक्रमास कमाल मंजुर विद्यार्थी संख्येकरीता आवश्यक प्रवेश या होत नसल्याने, महाविद्यालयांमध्ये देखिल जागा रिक्त राहत असल्याने तसेच सदर अभ्यासक्रम बंद केल्याने विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान होणार नसल्याने सदर अभ्यासक्रमाचे प्रथम वर्षाचे प्रवेश शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून थांबविण्याबाबत व्यवस्थापन परिषदेने निर्णय घेतला आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गुहागर (जि.रत्नागिरी) येथील खरे-ढेरे-भोसले महाविद्यालयातील गैरव्यवहाराबाबत

**(२०) ७४३० (१९-०८-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर (जि.रत्नागिरी) येथील खरे-ढेरे-भोसले महाविद्यालयातील प्रवेश, हजेरीपासून सर्व बनावट कागदपत्रे रंगवून, बोगस परीक्षा घेवून त्याची खोटी माहिती मुंबई विद्यापीठाकडे पाठवून विद्यार्थ्यांना थेट पदवी प्रमाणपत्र दिली जात असल्याचा आणि यातून करोडो रूपयांच्या गैरव्यवहार सुरू असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ च्या दरम्यान निदर्शनास आल्यानंतर दिनांक १८ मार्च, २०२५ रोजी अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून झालेल्या चर्चेवेळी मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांनी कारवाई करण्याचे आश्वासन देऊनही सदर संस्थेवर प्रशासक नेमण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहारातून कमावलेल्या पैशांबाबत स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाकडे चौकशी देऊन पैसे वसूल केले जातील असेही आश्वासन देण्यात आले होते, पण अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसून सदरहू गैरव्यवहारास पाठीशी घालण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासह थेट पदवी प्रमाणपत्र घेतलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांची पदवी रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१६-०६-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (व्यवस्थापन) कायदा, १९७६ मधील कलम ३ व ४ मधील तरतुदींनुसार संचालक, उच्च शिक्षण पुणे यांच्या दिनांक ०५/१२/२०२५ रोजीच्या आदेशानुसार सदर महाविद्यालयावर प्रशासक नियुक्त करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

सन २०२५ च्या पहिल्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये या विषयाच्या अनुषंगाने अर्धा-तास चर्चेदरम्यान मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी " परंतू प्राध्यापकांना मिळणारे पगार, अनुदान यात काही घोटाळा झाला आहे का, याची तपासणी केली जाईल, विधी व न्याय विभागाचे मत घेऊन हे प्रकरण एसीबीकडे देता येत असल्यास तशी कार्यवाही विभागाकडून केली जाईल" असे आश्वासन दिले होते.

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, पनवेल यांनी केलेल्या तपासणीनुसार सदर महाविद्यालयास दिलेल्या वेतन अनुदानाची रक्कम महाविद्यालयाने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वितरीत केले असून वेतन अनुदानात आर्थिक अनियमितता झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही.

सदर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे बनावट प्रवेश तसेच, बनावट पदवी प्रमाणपत्र घेतलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेवून असे पदवी प्रमाणपत्र रद्द करणेबाबत मुंबई विद्यापीठ यांनी दिनांक २०.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये समिती गठीत केलेली असून याबाबत चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकण विभागीय शिक्षण मंडळाकडून सन २०१२ व २०१३ च्या इयत्ता बारावी परीक्षांच्या निकालाची नोंदणी गहाळ झाल्याबाबत

**(२१) ७५२४ (१९-०८-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वतंत्र कोकण विभागीय शिक्षण मंडळाची मागणी मान्य झाल्यानंतर माहे मार्च, २०१२ मध्ये या बोर्डामार्फत पहिल्यांदा इयत्ता बारावीची परीक्षा घेण्यात आली आणि त्यानंतर इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांमध्ये कोकण बोर्ड राज्यात अव्वल ठरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२ व २०१३ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षांचे निकाल संबंधित मंडळाकडे उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकण मंडळ स्थापनेपासूनच अव्वल स्थानी असल्यामुळे सदर निकालांचे रेकॉर्ड जाणीवपूर्वक गहाळ करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नोंदणी गहाळ होण्यामागची कारणे काय आहेत, शासनाने याबाबत चौकशी करून संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (११-०५-२०२६) :** (१) हे खरे आहे. दिनांक ०१ मे, २०१२ पासून कोकण विभागीय मंडळाकडून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) च्या परीक्षा रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयासाठी आयोजित करण्यात येत असून इ.१० वी व इ.१२ वी च्या परीक्षांमध्ये कोकण विभागीय मंडळ राज्यातील एकूण ९ विभागीय मंडळामध्ये निकालामध्ये प्रथम क्रमांकावर आहे.

(२) व (३) हे खरे नाही. सन २०१२ व २०१३ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षांचे निकाल कोकण विभागीय मंडळाकडे उपलब्ध आहेत. कोकण विभागीय मंडळ स्थापनेपासूनचे कोणतेही अभिलेख, रेकॉर्ड सदर कार्यालयाकडून गहाळ झालेले नसून सर्व अभिलेख कार्यालयस्तरावर उपलब्ध आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा उपनिबंधक कार्यालयासाठी मंजूर पदे भरण्याबाबत

**(२२) ७९९५ (१९-०८-२०२५). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा उपनिबंधक कार्यालयासाठी १२३ पदे मंजूर असून विद्यमान स्थितीत या कार्यालयात गट “अ” ते गट “ड” वर्गातील ८१ अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयामार्फत जिल्ह्यातील ६०१ सेवा सहकारी संस्थांसह सहकारी वित्तीय संस्था, पतपेढी, शासकीय कर्मचाऱ्यांच्या विविध संस्था, बाजार समिती व सहकार क्षेत्रातील इतर संस्थांची कामे करण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या पीक कर्जाच्या वितरणाचा लेखाजोखा व सावकारी कर्जाची माहिती सदर कार्यालयामार्फत संकलित करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, शासनाच्या पणन व सहकार विभागांच्या विविध योजनांचे कार्यान्वयन या कार्यालयाकडून केले जात असून त्यामध्ये ४२ पदे रिक्त आहे व अमरावती तालुका उपनिबंधकांचे पद देखील रिक्त असून गट “ब” संवर्गातील १ पद रिक्त आहे, सदरचे पद मंजूर असतानाही ते पद भरण्यात आलेले नसल्याचे दिनांक १४ एप्रिल,

२०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (०९-०६-२०२६) :** (१) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती व त्यांचे अधिनस्त कार्यालयासाठी गट-अ ते गट-ड संवर्गाची १२३ पदे मंजूर आहेत. त्यापैकी सद्यस्थितीत ८७ पदे भरली आहेत.
(२) होय.
(३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती व त्यांचे अधिनस्त कार्यालयासाठी १२३ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ८७ पदे भरली असून ३६ पदे रिक्त आहेत. शासन आदेश दिनांक २६/०६/२०२५ अन्वये उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती तालुका हे पद भरण्यात आले आहे. तसेच गट- ब संवर्गाचे सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. अंजनगावसुर्जी हे पद दिनांक २८/०४/२०२५ पासून रिक्त आहे.
(४) शासनाने राज्यात सहकार विभागातील वर्ग-३ संवर्गात एकुण ७५८ पदे भरती केलेली असुन त्यापैकी अमरावती जिल्ह्यामध्ये ०७ कर्मचाऱ्यांना पदस्थापना देण्यात आली असून गट अ संवर्गातील एक पदावर पदस्थापना देण्यात आली आहे. तसेच उर्वरीत पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## जिल्हा पणन अधिकारी हिशोब शाखा, चंद्रपूर यांची चौकशी करण्याबाबत

**(२३) ८०८२ (१९-०८-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा मार्केटिंग अधिकारी श्री.व्हि.डी.तिवाडे, हिशोब शाखा, चंद्रपूर यांची तातडीने चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ मार्च, २०२५ रोजी वा त्या दरम्यान पणन मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.तिवाडे हे लोकप्रतिनिधींना माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर माहिती न देणा-या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१६-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) श्री.तिवाडे, जिल्हा पणन अधिकारी, चंद्रपूर यांच्या विरोधात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ,मुंबई मार्फत त्रिदस्यीय चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती. समितीच्या चौकशी अहवालानुसार, श्री.तिवाडे काही माहिती वेळेत देत नसल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाच्या वतीने श्री.तिवाडे, जिल्हा पणन अधिकारी, चंद्रपूर यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, महासंघाच्या सेवक सेवा नियमानुसार त्यांच्यावर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाच्या अधीनस्थ महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांच्या "करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (कॅस)" प्रक्रियेमध्ये होणाऱ्या अडथळ्यांबाबत

**(२४) ८१७० (१९-०८-२०२५). श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (कॅस)" अंतर्गत महाविद्यालयीन प्राध्यापकांना पदोन्नती मिळण्यासाठीची अधिकृत व्यवस्था असताना कॅस प्रक्रियेतील विविध अडथळे आणि अनागोंदी कारभारामुळे मुंबई विद्यापीठाच्या अधिनस्थ महाविद्यालयांतील शेकडो प्राध्यापक पदोन्नतीच्या लाभापासून वंचित असल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमानुसार प्राध्यापकांना पदोन्नती मिळणे अपेक्षित असूनही अद्याप पदोन्नतीसाठी संघर्ष करावा लागत असल्याचे महाराष्ट्र धर्मनिरपेक्ष शिक्षक संघटना (मस्ट) चे अध्यक्ष यांनी निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कॅस अंतर्गत सादर केलेल्या फाईल्सवर विद्यापीठातील सहाय्य कुलसचिव, उपकुलसचिव, डीन, कुलसचिव, प्र-कुलगुरु यांच्याकडून दीर्घ कालावधीने मंजुरी दिली जात असल्यामुळे, प्राध्यापकांना आर्थिक व व्यावसायिक नुकसान होत असून, त्यांना मानसिक तणावाखाली काम करावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कॅस प्रक्रियेमध्ये अडथळे न येण्यासाठी महाराष्ट्र धर्मनिरपेक्ष शिक्षक संघटना (मस्ट) या संस्थेशी सल्लामसलत करून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (११-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

विद्यापीठाचे परिपत्रक दिनांक ०१/०७/२०२४ व दिनांक १९/०८/२०२४ नुसार महाविद्यालयांकडून पात्र शिक्षकांचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार एकूण ३८६ (मुंबई विभाग १५३ व पनवेल विभाग २३३) प्रस्तावांना विद्यापीठ स्तरावर मान्यता देण्यात आली असून सद्य:स्थितीत कोणतेही कॅसअंतर्गत पदोन्नतीचे प्रस्ताव प्रलंबित नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सारंगपुरी (ता.शहापूर, जि.ठाणे ) येथील मुमरी धरणाचे काम मातीच्या अभावामुळे प्रलंबित असल्याबाबत

**(२५) ८१९२ (१९-०८-२०२५). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सारंगपुरी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील बहुचर्चित असलेल्या मुमरी धरण प्रकल्पाचे काम मातीच्या अभावामुळे माहे मार्च-एप्रिल, २०२५ मध्ये प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणासाठी शासनाने रुपये २०० कोटी इतका खर्च केला असून धरणाच्या उर्वरित भराव कामासाठी लागणारी माती धरण क्षेत्रात उपलब्ध नसल्याने अन्य ठिकाणाहून सदरील माती आणावी लागणार

आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माती विकत घेऊन त्याची प्रकल्पाच्या ठिकाणापर्यंत वाहतूक करणे यासाठी होणारा अतिरिक्त खर्च, जलसंपदा विभागाला परवडणारा नसून मुमरी प्रकल्पाच्या अंदाज पत्रकीय खर्चापेक्षा माती भरावासाठी होणारा हा वाढीव खर्च पाहता त्यासाठी शासनाची नव्याने मान्यता घेऊन माती वाहतुकीसाठी वहन अंतर (लीड) या सुधारित खर्चाच्या मान्यतेसाठी तसा प्रस्ताव जलसंपदा विभागाला सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-०५-२०२६) :** (१), (२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

मुमरी धरणाच्या माती कामासाठी आवश्यक असलेली गाभा भराव माती व कवच भराव माती बुडीत क्षेत्रात पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नसल्याने बुडीत क्षेत्राबाहेरून आणण्याचे प्रस्तावित आहे. मुमरी धरणाच्या माती कामासाठी आवश्यक असलेल्या माती वाहतुकीसाठीच्या वहन अंतराच्या (लीड) खर्चाचा प्रकल्पाच्या सातव्या सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये समावेश करण्यात आला आहे. मुमरी धरण कामावर रु.२१३.०३ कोटी इतका खर्च करण्यात आलेला आहे. भातसा प्रकल्पाच्या प्रस्तावित ७ व्या सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावाच्या मान्यतेची कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजनबाबत

**(२६) ८३८२ (०८-०९-२०२५). श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय शिक्षण विभागामार्फत पटसंख्येच्या निकषावरून मुंबईतील ५३० शिक्षकांना अतिरिक्त ठरवून त्यांचे जबरदस्तीने मुंबई बाहेरील शाळांमध्ये समायोजन करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिरिक्त ठरविण्यात आलेल्या शिक्षकांचे समायोजन मुंबईतीलच इतर शाळांमध्ये शक्य असूनही त्यांना मुंबई बाहेर समायोजन करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शिक्षकांनी समायोजन न स्वीकारल्यास त्यांचे वेतन थांबविण्यात येईल, असे सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबई बाहेरील समायोजन न थांबवल्यास शिक्षक भारती संघटनेने आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२२-०५-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) अशा प्रकारे संघटनेने आंदोलनाचा इशारा दिलेला नाही.
(५) संचमान्यतेच्या तरतूदीनुसार अतिरिक्त ठरलेल्या कर्मचा-यांच्या समायोजनाची सुधारीत कार्यपद्धती समायोजनाबाबतच्या शासन निर्णय दिनांक १५ मार्च, २०२४ अन्वये विहित करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोदावरी नदी पात्रात पाणी सोडणेबाबत

**(२७) ८५३० (३०-०७-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील गोदावरी नदी पात्रातील विविध बंधाऱ्यातील पाण्याची पातळी कमी झाली असल्याने तेथे पाणी सोडण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे सन २०२५ रोजी वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने प्रधान सचिव, जलसंपदा व कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विभाग यांना आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदेशाप्रमाणे गोदावरी नदी पात्रात पाणी सोडण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०६-२०२६) :** (१) व (२) हे, खरे आहे.

जायकवाडी धरणाच्या निम्न भागात ११ उच्च पातळी बंधारे असून एकूण उपयुक्त पाणीसाठ्याची ऑक्टोबर-२०२५ ची टक्केवारी ९८% व एप्रिल-२०२५ ची टक्केवारी २९.४४% होती.

दिनांक १२/०९/२०१८ रोजीचे शासन निर्णयान्वये मंजूर जायकवाडी प्रकल्पाच्या फेर जलनियोजन मध्ये जायकवाडी धरणातून बंधाऱ्यात पाणीसाठा करण्यासाठी गोदावरी नदीपात्रात पाणी सोडणेबाबत तरतूद नाही.

परंतू दुष्काळजन्य परिस्थितीत किंवा अवर्षणग्रस्त भागात उच्च पातळी बंधाऱ्याला जायकवाडी धरणातून नदीद्वारे पाणी सोडण्यासाठी शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०१८ नुसार, संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून मागणी प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पाणी मागणीच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

प्रचलित शासन निर्णयानुसार आकस्मित पाणी मागणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांच्या कडून गोदावरी नदी पात्रातील पाणी सोडण्यासाठी मागणी प्राप्त झाल्यावर कार्यकारी संचालक यांच्या आदेशान्वये आकस्मिक पाणी सोडण्याबाबत कार्यवाही वेळोवेळी करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्राथमिक शाळांमधील समित्यांचे एकत्रिकरणाबाबत

**(२८) ८७८५ (२४-०७-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिपत्याखालील प्राथमिक शाळांमधील विविध १५ समित्यांचे एकत्रीकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकत्रीकरणाच्या निर्णयांतर्गत कोणकोणत्या समित्यांचा समावेश असून त्यांचे एकत्रिकरण करण्याचे स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, समित्यांचे एकत्रीकरणाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येत असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२४-०६-२०२६) :** (१), (२) व (३) शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळास्तरावर पूर्वी एकूण १५ समित्या कार्यरत होत्या. विविध समित्यापैकी काही समित्यांचे कामकाज आणि शाळा व्यवस्थापन समितीकडे असलेले कामकाज यांच्यात समानता आढळून येत होती. तसेच समित्यामध्ये काही ठिकाणी पदांची व त्यामध्ये असलेल्या कार्यांची द्विरुक्ती होत होती. त्यामुळे काही समित्यांचे एकत्रिकरण करून शाळा स्तरावर फक्त ४ समित्या १) शाळा व्यवस्थापन समिती, २) सखी सावित्री समिती, ३) महिला तक्रार निवारण समिती/ अंतर्गत तक्रार समिती व ४) विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समिती ठेवण्यात आल्या आहेत. त्यामुळे मुख्याध्यापक व शिक्षकांना अध्ययन/अध्यापनासाठी व शालेय कामकाजासाठी अधिकचा वेळ उपलब्ध होऊ शकणार आहे. त्याबाबत दिनांक १६/०४/२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**"१०० शाळांना भेट" या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत**

**(२९) ८७९५ (१९-०८-२०२५). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने “१०० शाळांना भेट” हा कार्यक्रम माहे मे, २०२५ मध्ये जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यक्रमांतर्गत शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी लोकप्रतिनिधी व संबंधित अधिकाऱ्यांनी १०० शाळांना भेट देण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, “१०० शाळांना भेट” या कार्यक्रमाची अंमलबजावणी, उद्दिष्टे व स्वरूप काय आहे,
(४) असल्यास, भेट देण्यात येणाऱ्या शाळेतील कार्यक्रमांची रूपरेषा काय असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१२-०६-२०२६) :** (१), (२), (३) व (४) सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी सर्व मा. मंत्री, लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकारी यांनी नजिकच्या शाळेत उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत करावे तसेच १०० शाळांना भेटी द्याव्यात असा अभिनव उपक्रम राबविण्याचा निर्णय दिनांक १२/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला.

शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी मा.राज्यपाल, मा.मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, सर्व मा. मंत्री, लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी यांनी नजिकच्या शाळेत प्रत्यक्ष उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांचा उत्साह वाढविण्यास हातभार लावला.

१०० शाळांना भेटी या उपक्रमातंर्गत मान्यवरांनी शाळांच्या कामकाजाचा व शैक्षणिक गुणवत्तेचा आढावा घेणे अभिप्रेत होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा जिल्हा परिषदांच्या शाळेत प्रवेश घेण्याकडे कल वाढविण्यासाठी उपाय योजना सुचविणे हा या उपक्रमाचा महत्वाचा भाग होता. त्याचप्रमाणे भौतिक सुविधा, क्रिडा विषयक सुविधा, पोषण आहार व अन्य पुरक व्यवस्थेच्या दर्जाचा आढावा घेऊन संबंधितांना मार्गदर्शन करणे हा देखील या उपक्रमाचा भाग होता. जीर्ण इमारती व धोकादायक बांधकामाबाबत संबंधित यंत्रणेस तात्काळ अवगत करण्याबाबत मान्यवरांनी सूचना देणे असे या उपक्रमांतर्गत अपेक्षित होते.

उपरोक्त उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आला. विभागाचे मंत्री, लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकारी यांनी शाळांना भेटी देऊन सदर उपक्रमांतर्गत आवश्यक असणारी जबाबदारी पार पाडली आहे. शालेय शिक्षण विभागाच्या अधिनस्थ एकूण १३,२४१ अधिकाऱ्यांनी शाळांना भेटी दिल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अल्पसंख्याक शाळांना पायाभूत सुविधांसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाबाबत**

**(३०) ९८७८ (२३-०७-२०२५). श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अल्पसंख्याक शाळांना पायाभूत सुविधांसाठी देण्यात येणारे अनुदान रुपये १० लाख इतके वाढविण्याचा शासन निर्णय विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेपूर्वी जाहीर करण्यात आलेला असून सदर योजनेसाठी शाळांचे प्रस्ताव अद्याप मागविण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळांच्या पायाभूत सुविधा योजनेअंतर्गत सन २०२३–२४ मधील प्रस्ताव लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यामुळे प्रलंबित राहिले असून संबंधित शाळांना अद्याप अनुदान वितरीत करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पात्र अल्पसंख्याक शाळांना अनुदान वितरित करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (०६-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही,

शासन निर्णय दिनांक ७/१०/२०२४ अन्वये सदर योजनेअंतर्गत पायाभूत सोयीसुविधेसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाची मर्यादा रू. २.०० लाखावरून वाढवून रू. १०.०० लाख करण्यात आले आहे. तथापि तत्पूर्वीच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासन मान्य खाजगी अनुदानित / विना अनुदानित / कायम विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपरिषद, नगरपालिका शाळा, व अपंग शाळां यांच्याकडून अर्ज मागविण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक १९ जुलै, २०२४ अन्वये सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले होते. तद्नंतर तत्कालीन मा. मंत्री यांच्या निर्देशानुसार विभागाच्या दिनांक १९/०७/२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये मागविलेले अल्पसंख्याक शाळांचे प्रस्ताव हे रद्द करण्यात आले असून सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये, शासन परिपत्रक दिनांक १३/०२/२०२४ नुसार सर्व जिल्हाधिकारी यांच्याकडून पुनश्च: प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.
(२) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये शासनास रू.४.०० कोटी इतका निधी बीम्स प्रणालीवर प्राप्त झाला होता. यापैकी रू.३.७४ कोटी इतका निधी १८७ शाळांना वाटप करण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील तालुकास्तरावरील क्रीडा अधिकाऱ्यांच्या पदभरतीबाबत**

**(३१) १०००९ (२४-०७-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील तालुकास्तरावर क्रीडा अधिकारी पदे भरण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली जिल्ह्यातील एकूण १० तालुक्यांपैकी केवळ ३ तालुक्यांमध्ये क्रीडा अधिकाऱ्यांची पदे भरलेली असून उर्वरित ७ तालुक्यांमध्ये सदर पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, क्रीडा अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे स्थानिक खेळाडूंना शासकीय योजना व सेवा मिळण्यात अडचणी निर्माण होत असून मार्गदर्शनासाठी त्यांना मुंबई किंवा पुणे येथे जावे लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरून काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (२४-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) सांगली जिल्ह्यात १० तालुक्यापैकी जत, वाळवा व खानापूर या तीन तालुक्यात तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची ०३ पदे मंजूर आहेत. सदर ०३ पदे माहे मे, २०२५ पर्यंत भरण्यात आली होती. सद्य:स्थितीत जत तालुक्यातील १ पद रिक्त असून सदर पद भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) हे खरे नाही.
(४) तालुका क्रीडा अधिकाऱ्याचे रिक्त १ पद भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) विलंब झालेला नाही.

---

## खेड तालुक्यात क्रीडा विकास आणि युवा सक्षमीकरणाबाबत

**(३२) ११६५१ (२४-०७-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड तालुक्यात क्रीडा विकासाला चालना देण्यासाठी विविध उपक्रम आणि योजना राबविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खेड तालुक्यातील तरुणांना क्रीडा प्रशिक्षण कार्यक्रम, युवा क्लब आणि सामुदायिक सेवा यामध्ये संधी उपलब्ध होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, क्रीडा व युवक विकासासाठी खेड तालुक्यातील युवकांना प्रशिक्षण, मार्गदर्शन व प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, खेड तालुक्यातील तरुणांमध्ये आत्मविश्वास आणि कौशल्ये वाढवण्यासाठी तसेच त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात सकारात्मक योगदान मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (०७-०३-२०२६) :** (१) होय,
(२) हे खरे नाही.
(३) व (४) खेड तालुक्यातील मौजे तिन्हेवाडी येथील गट क्र.१२९ मधील ९ एकर जागेवर तालुका क्रीडा संकुल उभारण्यात आले आहे. सद्यस्थितीत येथे इनडोअर हॉल, ४०० मीटर धावणमार्ग (Track) आणि बास्केटबॉल कोर्ट खेळाडूंसाठी उपलब्ध आहे. तसेच, तालुक्यातील खेळाडूंच्या मागणीनुसार येथे कबड्डी व तायक्वांदो या खेळांची विशेष प्रशिक्षण केंद्रे कार्यान्वित आहेत. क्रीडा संकुलाच्या अद्ययावतीकरणाचा भाग म्हणून सध्या

जलतरण तलावाचे (Swimming Pool) बांधकाम प्रगतीपथावर असून, ते काम विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. शासनाच्या धोरणानुसार, तालुका स्तरावरील विविध शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन या संकुलात नियमितपणे केले जाते. ग्रामीण भागातील उदयोन्मुख खेळाडूंना तांत्रिक मार्गदर्शन मिळावे यासाठी वेळोवेळी क्रीडा प्रशिक्षण कार्यक्रमांचेही आयोजन केले जात आहे. ग्रामपंचायतींकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांनुसार गावागावांत व्यायामशाळा साहित्य, खुली व्यायामशाळा (Open Gym) आणि शाळांना क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात येते. सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात सकारात्मक योगदान देणाऱ्या पात्र ग्रामीण स्वयंसेवी व समाजसेवा संस्थांना विहित कार्यपध्दीनुसार रु.२५,०००/-चे अनुदान दिले जाते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबईतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत पार्किंगची व्यवस्था करणेबाबत

**(३३) ११९३६ (२४-०७-२०२५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये राज्य तसेच परराज्यातून हजारो वाहने येत असून वाहनांना पार्किंगची योग्य व्यवस्था नसल्याने या वाहनधारकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवी मुंबईतील एपीएमसी बाजार समितीमध्ये एकूण पाच बाजारपेठा कार्यरत असून यामध्ये भाजीपाला, फळे, कांदा-बटाटा, धान्य व किराणा तसेच मसाला बाजारामध्ये दिवसाला कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असतानाही या मार्केटमध्ये येणाऱ्या वाहनधारक व वाहन चालकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत उक्त बाजार समितीमध्ये वाहतुकीच्या नियोजनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०८-०७-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) वाहतुक शाखा, तुर्भे, नवी मुंबई यांच्या मदतीने मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीमार्फत वाहतुकीचे नियोजन करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अचलपूर (जि. अमरावती) येथे अभियांत्रिकी व कृषी महाविद्यालय स्थापन करणेबाबत

**(३४) १२२८९ (०८-०९-२०२५). श्री.प्रविण तायडे (अचलपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अचलपूर (जि.अमरावती) येथे गेल्या २५ वर्षांपासून एकही अभियांत्रिकी महाविद्यालय किंवा कृषी विद्यालय उभारण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अचलपूर जिल्हा होण्याच्या प्रक्रियेत असूनही उच्च शिक्षणाच्या मूलभूत सुविधा अद्याप उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती इत्यादी मोठ्या शहरांमध्ये स्थलांतर करावे लागते, तसेच रोजगारासाठी देखील त्याच ठिकाणी जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अचलपूरमधील तरुण शिक्षण आणि रोजगाराच्या संधींपासून वंचित राहत असल्यामुळे अचलपूर येथे अभियांत्रिकी व कृषी महाविद्यालय स्थापन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०६-२०२६) :** (१) अचलपूर येथे अभियांत्रिकी महाविद्यालय नाही. तथापि, सदर ठिकाणी शासकीय तंत्रनिकेतन, अचलपूर ही पदविका अभ्यासक्रमाची संस्था कार्यरत आहे. तसेच, राज्यात नवीन कृषि / कृषि संलग्न महाविद्यालये स्थापन न करण्याचा निर्णय कृषी विभागाने घेतला आहे.
(२), (३) व (४) प्रत्येक जिल्हयामध्ये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचे धोरण नाही. अमरावती विभागात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, यवतमाळ हे दोन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये कार्यरत आहेत. तसेच अमरावती विभागात एकूण २३ अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था कार्यरत असून त्यापैकी अमरावती जिल्ह्यात ९ खाजगी विनाअनुदानीत अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था कार्यरत आहेत. राज्यातील नवीन कृषि/कृषि संलग्न महाविद्यालये व संशोधन केंद्राची मोठ्या प्रमाणावरील मागणी तसेच, कृषि/ कृषि संलग्न महाविद्यालयांचे शासनावरील मोठ्या प्रमाणावरील दायित्व विचारात घेवून, नवीन कृषि/ कृषि संलग्न महाविद्यालये स्थापन न करण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांकडील दिनांक २०/०३/२०२५ रोजीच्या बैठकीतील निदेशानुसार कृषी विभागाने निर्णय घेतला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अकृषी विद्यापीठांमधील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३५) १२३०७ (०८-०९-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील तेरा अकृषी विद्यापीठांमध्ये सुमारे ११ हजार प्राध्यापकांची पदे गेल्या अनेक वर्षांपासून रिक्त असल्याचे दिनांक २ जून, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अनेक महाविद्यालये व विद्यापीठे ओस पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रिक्त पदांचे नेमके कारण काय आहे, या स्थितीमुळे उच्च शिक्षण क्षेत्रावर होणाऱ्या परिणामांबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर रिक्त पदे तात्काळ भरण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०६-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
राज्यातील सार्वजनिक विद्यापीठातील एकूण २६०२ पदांपैकी १४९८ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) राज्यातील सार्वजनिक विद्यापीठातील १४९८ रिक्त पदांपैकी शासन निर्णय दिनांक ०७/०८/२०१९ अन्वये ६५९ पदांना व शासन निर्णय दिनांक १९/०९/२०१९ अन्वये २८ पदांना अशा एकूण ६८७ पदांच्या

भरतीस मान्यता देण्यात आली आहे.

तसेच सार्वजनिक विद्यापीठांमधील पदभरती प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी शासन निर्णय दिनांक ११/०२/२०२६ अन्वये शैक्षणिक आणि संशोधनासाठी ६०%, अध्यापन कौशल्य मूल्यांकनासाठी २०% आणि मुलाखत कामगिरीसाठी २०% गुण या सुधारित तरतुदीनुसार विद्यापिठातील अध्यापकीय पदांची पदभरती करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील दुधगंगा नदीच्या डाव्या कालव्याच्या वरील बाजूला असलेल्या शेती क्षेत्रासाठी नवीन उपसा सिंचन योजना राबविण्याबाबत

**(३६) १२४०१ (३०-०७-२०२५). श्री. अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर दक्षिण विधानसभा मतदार संघातील दिंडनेर्ली गावाजवळ असलेल्या दूधगंगा नदीच्या डाव्या कालव्याच्या वरील बाजूला असलेल्या सुमारे ५३८० हेक्टर शेती क्षेत्रासाठी नवीन उपसा सिंचन योजना करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली असल्याची बाब माहे मे, २०२५ च्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय?

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२७-०४-२०२६) :** (१) होय, खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी त्यांचे दिनांक ०८/०१/२०२४, दिनांक ०७/०६/२०२४ रोजी तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना व दिनांक १३/१२/२०२४ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना विनंती केली आहे.

(२) दिंडनेर्ली उपसा सिंचनेकरिता पाणी उपलब्धतेच्या अनुषंगाने दूधगंगा व तुळशी प्रकल्पाच्या एकत्रित पाणी वापर सुधारित जलनियोजनास मान्यतेबाबतची कार्यवाही शासन स्तरावर चालू आहे. सुधारित जलनियोजनानंतर उपसा योजनेस मा. मुख्यमंत्री यांची मान्यता मिळालेनंतर योजनेचे सर्वेक्षण व अन्वेषण करुन प्रशासकीय मान्यतेबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## करमाळा व कुर्डूवाडी (जि. सोलापूर) येथे प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रमांतर्गत अभ्यासिका केंद्र स्थापन करणेबाबत

**(३७) १२९७६ (०८-०९-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरपरिषद करमाळा व कुर्डूवाडी (जि. सोलापूर) येथे 'प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रमांतर्गत' अभ्यासिका केंद्र स्थापन करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये मा. युवक कल्याण मंत्र्यांकडे लेखी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभ्यासिका केंद्रासाठीचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना प्रशासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (१६-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सोलापूर जिल्ह्यातील विकास कामाचा सविस्तर प्रस्ताव जमीनीच्या उपलब्धतेसह (परिपूर्ण अंदाजपत्रक, आराखड्यासह) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत केंद्र शासनाच्या PMJVK पोर्टलमार्फत शासनास सादर करण्यासाठी विभागाच्या दिनांक २४/०३/२०२५ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, सोलापूर यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कृषी, वैद्यकीय तसेच उच्च व तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेश प्रक्रियेत समानता आणण्याबाबत**

**(३८) १३१३२ (१९-०८-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषी, वैद्यकीय तसेच उच्च व तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेश प्रक्रियेसाठी विविध प्रवेशपूर्व परीक्षांची गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर वेगवेगळी प्रवेश प्रक्रिया राबविली जात असल्यामुळे संस्थाचालक, महाविद्यालय व विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच गोवा राज्याच्या धर्तीवर उक्त सर्व अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेश प्रक्रियेत समानता आणावी, अशी मागणी प्रवेश परीक्षा तज्ज्ञांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, त्यानुषंगाने राज्यातील कृषी, वैद्यकीय तसेच उच्च व तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेश प्रक्रियेत समानता आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१०-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही. विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी पात्रता निकष, प्रवेश परीक्षा, गुणवत्ता निर्धारण निकष, संबंधित शिखर संस्थांचे नियम, अधिनियम व मार्गदर्शक सूचना या भिन्न असल्यामुळे अभ्यासक्रमनिहाय स्वतंत्र गुणवत्ता यादी जाहीर करून स्वतंत्र प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. अभियांत्रिकी, विधी, औषधनिर्माण कृषी, वैद्यकीय, ई. अभ्यासक्रमांसाठी संबंधित शिखर परिषदांनी (उदा. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, भारतीय विधिज्ञ परिषद, भारतीय औषधनिर्माण परिषद इ.) निर्धारित केलेले निकष, प्रवेश नियम, मान्यता अटी, प्रवेश क्षमता व वेळापत्रक लागू असतात. त्यानुसार प्रवेश प्रक्रिया राबविणे बंधनकारक आहे.
(२) हे खरे नाही.
(३) विविध विभागांतर्गत येणारे अभ्यासक्रम हे संबंधित शिखर परिषदांच्या अधिनियम, नियमावली, पात्रता निकष, प्रवेश प्रक्रिया व अटी तसेच राज्य शासनाच्या अधिनियम, अधिसूचना व आदेशांच्या अधीन राहून राबविण्यात येतात. सदर बाबी वैधानिक तरतुदींशी निगडित असल्यामुळे सर्व अभ्यासक्रमांसाठी एकसमान प्रवेश प्रक्रिया लागू करण्याची बाब वस्तुस्थितीस धरुन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चांदवड तालुक्यातील (जि.नाशिक) पुणेगाव-दरसवाडी-डोंगरगाव पोहोच कालव्यावरील प्रस्तावित गेटच्या कामांना सुरुवात झाली नसल्याबाबत

**(३९) १३२४३ (१९-०९-२०२५). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदवड (जि.नाशिक) तालुक्यातील पुणेगाव-दरसवाडी-डोंगरगाव पोहोच कालव्यावरील प्रस्तावित गेटच्या कामांना अद्याप सुरुवात झाली नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्याच्या गेटची सुरुवात न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०४-२०२६) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

चांदवड तालुक्यातील दरसवाडी पोहोच कालव्यावरील बांधकामे व अस्तरीकरणाचे कामे क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर असून मंजुर निविदेनुसार कालव्याच्या किमी ० ते ८८ मध्ये प्रस्तावित एकुण ८ गेट ( Gate) ची कामे अस्तरीकरणाचे काम अंतिम झाल्यानंतर निविदा कालावधीत पूर्ण करण्याचे क्षेत्रीय स्तरावर नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पातील अतिरिक्त पाणी मराठवाडयास देणेबाबत

**(४०) १३२६३ (०८-०९-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या दिनांक २० ऑगस्ट, २०२४ च्या शासन निर्णयान्वये वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पास प्रशासकीय मान्यता दिली असून या प्रकल्पाद्वारे विदर्भातील सहा जिल्ह्यांना लाभ होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पामध्ये अतिरिक्त ठरणारे सुमारे ३४ टीएमसी (TMC) पाणी मराठवाड्याच्या नांदेड, हिंगोली व परभणी या जिल्ह्यांकरीता वळविण्यात यावे अशी विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींना दिनांक २८ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-०५-२०२६) :**(१) होय, अंशत: खरे आहे.

सविस्तर सर्वेक्षणानुसार वैनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळे विदर्भातील नागपूर, भंडारा, वर्धा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम व बुलढाणा या ८ जिल्ह्यांना सिंचनाचा लाभ देण्याचे प्रस्तावित आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पासाठी ६२.५७ टीएमसी पाणी उपलब्ध असून त्याद्वारे भंडारा, नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा आणि वाशिम या जिल्ह्यातील सिंचन व घरगुती वापरा करिता नियोजन प्रस्तावित आहे.

मराठवाडयातील क्षेत्रास पाणी देण्याचे दृष्टीने तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता याचा अभ्यास प्रगतीपथावर असून, सदर अभ्यासाअंती या क्षेत्राकरीता आवश्यक पाणी गरज व उपलब्ध पाण्याचा ताळेबंद करूनच वाढीव

क्षेत्राचा वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पामधील समावेश निश्चित करणे शक्य होईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाची तुट भरून काढण्याबाबत**

**(४१) १३२७३ (०८-०९-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाची तुट भरून काढण्यासाठी प्रकल्पाच्या मंजुर ६ व्या सुधारित प्रशासकीय मान्यतेमध्ये दिगडी उपसा योजना (५८२ दलघमी) व गोजेगाव उपसा योजना (९७ दलघमी) या दोन्ही योजनांच्या कामाचा समावेश आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दोन्ही योजनांचे सर्वेक्षण, अन्वेषण व संकल्पन झाले आहे काय,
(३) असल्यास, सदर कामाचे नियोजन करून नव्याने प्रशासकीय मान्यता घेवून आदेश निर्गमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-०६-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाच्या मंजूर ६ व्या सुप्रमा मध्ये या दोन्ही योजनेच्या केवळ सर्वेक्षण कामाचा समावेश आहे.
(२) नाही.
(३) उपरोक्त दोन्ही उपसा सिंचन योजनेचे सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम पूर्ण झाल्याचा प्रस्ताव महामंडळाकडून प्राप्त झाल्यानंतर प्रस्तुत दोन योजनांसह प्रकल्पास नव्याने सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोयना प्रकल्पातील शासकीय कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी यांचे समस्यांबाबत**

**(४२) १४३१० (१९-०८-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोयना जलविद्युत प्रकल्प (स्तर-३), वसाहत अलोरे येथे पाणीपुरवठा, जलनिसारण व मलनिसारण यंत्रणा सुस्थितीत ठेवण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, निर्लेखित वाहनांच्या जागी नवीन वाहने व रुग्णवाहिका खरेदीसाठी अतिरिक्त अनुदान देणे, उप अभियंता, यांत्रिकी उपविभाग, कोयनानगर यांचे कार्यालय अभियंता, यांत्रिकी विभाग (कोयना प्रकल्प) (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) यांचेकडे वर्ग करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच शासकीय निवासस्थानी अनुज्ञप्ती शुल्क वसुली संदर्भातील प्रश्न सोडविणे, व कंत्राटी कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या परिपत्रक क्र.संकिर्ण-२०१९/प्र.क्र.१३/कामगार-८, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ नुसार वेतन अदा करण्याची कार्यपद्धती प्रभावीपणे राबविण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, निर्लेखित वाहनांच्या जागी नवीन वाहने व रुग्णवाहिका खरेदीसाठी अतिरिक्त अनुदान देण्यात आले आहे. तथापि, उपअभियंता यांत्रिकी उपविभाग, कोयनानगर यांचे कार्यालय, यांत्रिकी विभाग (कोयना प्रकल्प) ता. चिपळूण जि. रत्नागिरी यांचेकडे वर्ग करण्यात आलेले नाही.
(३) होय, हे अंशत: खरे आहे.
शासन निर्णय वित्त विभाग दिनांक १९/०१/२०२३ नुसार अनुज्ञाप्ती शुल्काची वसुली करण्यात येते. जलसंपदा विभागामार्फत प्रकल्पांची देखभाल व दुरुस्ती कामे जलसंपदा विभागाच्या निविदा बाबत निर्गमित शासन निर्णय तरतुदीनुसार राबविणेत येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**छत्रपती संभाजीनगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील उप कुलसचिव यांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याबाबत**

**(४३) १५४५७ (१८-०८-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील उप कुलसचिव श्रीमती हेमलता ठाकरे यांनी झोपेच्या गोळ्या घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला असून, विद्यापीठातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या मानसिक छळाला कंटाळून त्यांनी हे पाऊल उचलल्याचा आरोप केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ‘ऑफिसमधून होणाऱ्या छळामुळे जगण्याची इच्छा संपली आहे’, तसेच एका साहित्य चोरीच्या खोट्या आरोपाचा आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्या विरोधात पोलिसात खोटी तक्रार दाखल केल्याचा उल्लेख त्यांनी लिहिलेल्या चिठ्ठीत केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उप कुलसचिव श्रीमती हेमलता ठाकरे यांनी केलेल्या आत्महत्येच्या प्रयत्नाबाबत शासनाने चौकशी करून समिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच समितीत कोणते सदस्य आहेत व चौकशीचा अहवाल सादर करण्याबाबतची विहीत कालमर्यादा किती आहे,
(४) असल्यास, ज्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर मानसिक छळाचा आरोप केला आहे, त्यांची नावे काय आहेत तसेच, त्यांच्यावर कोणती प्रशासकीय कारवाई (उदा. निलंबन, बदली) करण्यात आली आहे, तसेच ‘साहित्य चोरीचा खोटा आरोप’ आणि ‘वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पोलिसांत खोटी तक्रार दाखल करणे’ या आरोपांची सत्यता पडताळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५)असल्यास, विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना कार्यस्थळी मानसिक छळ होऊ नये याकरिता कोणती उपाययोजना केली आहे,
(६) असल्यास, या प्रकरणात दोषी आढळणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह तसेच भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळता येईल याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०६-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) उप कुलसचिव श्रीमती हेमलता ठाकरे यांनी केलेल्या आत्महत्येच्या प्रयत्नाबाबत निवृत्त न्यायाधीश श्री. पी. एस. परांजपे यांची चौकशी समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीची चौकशी सुरू आहे.

(४) याबाबत श्रीमती ठाकरे यांनी जिल्हा आणि सत्र न्यायालय, छत्रपती संभाजी नगर येथे प्र.क्र. ३१६/२०२५ दाखल केले असून ते न्यायप्रविष्ट आहे.
(५) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ७९ नुसार तक्रार निवारण समिती कार्यरत आहे.
(६) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ७९ नुसार तक्रार निवारण समिती कार्यरत आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील के. एल. पोंदा हायस्कूलमध्ये झालेल्या धान्याच्या गैरव्यवहाराबाबत

**(४४) १५५०० (१४-०५-२०२६). श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा. पंतप्रधान पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत डहाणू तालुक्यातील के. एल. पोंदा हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना अपेक्षित प्रमाणापेक्षा कमी धान्याचा आहार देण्यात येत असून सुमारे ८०० किलोपेक्षा अधिक धान्याचा गैरव्यवहार होत असल्याबाबतच्या तक्रारी दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या दरम्यान प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंदाजे रोज ७० ते ८० किलो धान्य शिजवणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात फक्त ३० ते ४० किलो धान्य शिजवले जात असल्याचे आढळून आले आहे हे, ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त शाळेला जळगाव येथील साई फेडरेशन या संस्थेमार्फत धान्याचा पुरवठा केला जात असल्याबाबतची चौकशी करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शाळेचे मुख्याध्यापक श्री. सोपान इंगळे यांना लेखी नोटीस बजावण्यात आली आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी व्यक्तींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२४-०६-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

के.एल.पोंदा हायस्कुल यांनी एम.डी.एम. पोर्टलवर दररोज ७० किलो तांदूळ शिजवत असल्याची नोंद केली आहे. तथापि, अधीक्षक (शापोआ), पंचायत समिती, डहाणू यांच्या तपासणीत केवळ ३० ते ४० किलो तांदूळ शिजवत असल्याचे निदर्शनास आले.
(३) हे खरे नाही.
(४) होय, हे खरे आहे.
(५) सदर प्रकरणी उपशिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, पालघर यांच्या अध्यक्षतेखाली चार सदस्यीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती.

चौकशी समितीच्या अहवालानुसार संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांच्याकडून प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना राबविण्यात अनियमितता झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे मुख्याध्यापक यांच्यावर कारवाई करुन त्यांची एक वेतनवाढ रोखण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक सिंचन विभागातील पुणे गाव कालवा उपविभागांतर्गत डाव्या कालव्याच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार

**(४५) १५५१४ (०९-०४-२०२६). श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक सिंचन विभागातील पुणे गाव कालवा उपविभागांतर्गत डाव्या कालव्याचे काम पूर्ण न करता कालव्याचे कार्यकारी अभियंता श्री.मनोज कुमार ढोकळे, उप अभियंता, श्रीमती योगिता घुगे, शाखा अभियंता, लेखा शाखेतील कर्मचारी श्री.वाल्मीक खैरे यांनी रुपये १२ कोटी इतक्या रकमेची बोगस बिले सादर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी रुपये ८ कोटी इतक्या न झालेल्या कामाचे मंजूर पास करून शासनाची कोट्यवधी रुपयांची आर्थिक लूट केल्याच्या लेखी तक्रारी मा. मुख्यमंत्री, मुख्य अभियंता, मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, जलसंपदा विभाग, यांच्याकडे करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामासंदर्भात सुरुवातीला रुपये ५ कोटी इतक्या रकमेचे बिल अदा करण्यात आले असतानाही कोणत्याही कामाची पूर्ण तपासणी न करता पुन्हा रुपये १२ कोटी इतक्या रकमेचे बिल ठेकेदाराला अदा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कालव्याचे कार्यकारी अभियंता श्री.मनोज कुमार ढोक चवळे व उप अभियंत्या श्रीमती योगिता घुगे तसेच शाखा अभियंता, श्री.वाल्मीक खैरे यांनी कंत्राटदाराशी संगणमत करून कालव्याचे ठिकाणी प्रत्यक्षात कामकाज न करता तब्बल रुपये १२ कोटी इतक्या रकमेची बोगस बिले महामंडळ संभाजीनगर कार्यालयाकडे अति तातडीने तयार करून सादर केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०७-२०२६) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) होय, मुख्य अभियंता यांच्याकडे सदर कामाबाबत तक्रार प्राप्त झाली आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

कार्यक्षेत्रावर प्रत्यक्षात झालेल्या कामाप्रमाणे सदर कामाचे माहे मार्च, २०२५ पर्यंत ५ धावती देयके अदा करण्यात आलेली आहे. ५ कोटींचे देयक (प्रत्यक्षात अदा ३.९५ कोटी) हे चौथे धावते देयक असून कार्यक्षेत्रावर आतापर्यंत झालेल्या कामापोटी ते अदा करण्यात आलेले आहे. तद् नंतरचे रुपये १२ कोटीचे देयक (प्रत्यक्षात अदा ११.७६ कोटी) हे ५ वे धावते देयक असून माहे मार्च २०२५ पर्यंत कार्यक्षेत्रावर प्रत्यक्षात झालेल्या कामापोटी ते अदा करण्यात आलेले आहे. महामंडळ कार्यालयाकडून सदर मागणी पोटी रू.८.०० कोटी इतका निधी प्राप्त झाला. सदर प्राप्त निधी देयकापोटी अभिकरणास अदा करण्यात आला.

(५) होय, चौकशी करण्यात आली आहे.

सदर तक्रारींच्या अनुषंगाने त्रयस्थ उपअभियंता यांच्या पथकाडून प्रत्यक्ष कामाची पाहणी करून झालेले काम व मोजमाप पुस्तकात अभिलेखीत केलेल्या कामाची पडताळणी करून अहवाल सादर केला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विशेष कार्यकारी सहकारी सोसायट्यांवर कार्यरत असलेल्या गटसचिवांचे वेतन व सेवानिवृत्त गटसचिवांचे निवृत्तीवेतन रखडलेबाबत

**(४६) १५६५९ (१७-०२-२०२६). श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतीसाठी पीक कर्ज उपलब्ध करणाऱ्या ग्रामीण भागातील विशेष कार्यकारी सहकारी सोसायट्यांवर कार्यरत अडीच हजार गटसचिवांचे वेतन मागील दीड ते दोन वर्षापासून रखडल्याचे माहे ऑगस्ट २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवडणुकीपूर्वी दिलेल्या कर्जमाफीच्या प्रतिक्षेत असलेल्या राज्यातील ५० टक्के शेतकऱ्यांनी गावातील सहकारी सोसायटींच्या कर्जाची परतफेड केली नाही. कर्जवसुलीच होत नसल्याने सोसायट्यांकडे निधीच उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील दीड ते दोन वर्षापासून राज्यातील सेवानिवृत्त गटसचिवांना देखिल अंतिम देयके मिळालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वेतन न मिळाल्याने गटसचिव आर्थिक अडचणीत सापडले आहेत, त्यांच्या उदरनिर्वाहावर त्याचा परिणाम होत आहे. पीक कर्ज वितरणाच्या प्रक्रियेत उशीर होऊन शेतकऱ्यांना कर्ज मिळण्यास अडचणी येत आहेत, तसेच, गटसचिवांना वेळेत मानधन न दिल्याने सहकारी संस्थांचे कामकाजही वेळेत पूर्ण होत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर सहकारी सोसायटयांवर कार्यरत असलेल्या गटसचिवांचे व सेवानिवृत्त गटसचिवांचे वेतन मिळावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (०३-०६-२०२६) :** (१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

दिनांक ३१/०३/२०२५ अखेर राज्यामध्ये जिल्हा देखरेख सहकारी संस्थेमध्ये ४८६२ सचिव कार्यरत होते. यापैकी १९२१ गटसचिवांची देय रक्कम (थकबाकीसह) रू.८७.४३ कोटी असून सध्याची देयबाकी रू. १२४.८३ कोटी आहे. या रकमेमध्ये ९१४ सेवानिवृत्त गटसचिवांच्या देय रकमांचा समावेश आहे.

राज्यातील बहुतांश विविध कार्यकारी सहकारी संस्था ह्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून कर्ज घेऊन सभासद शेतक-यांना कर्ज वितरित करत आहेत. या बँकांनी विकास संस्थांच्या माध्यमातून शेतक-यांना दिलेल्या शेती कर्जाची दिनांक ३०/०६/२०२५ अखेरची वसुलपात्र रक्कम रू. ४०,६३९.०० कोटी आहे. त्यामध्ये थकबाकीची मागणी रू.१६,७००.०० कोटी व चालू कर्जाची मागणी रू.२३,९३९.०० कोटी आहे. सदर कर्जाच्या वसुलीचा कालावधी दिनांक ३०/०६/२०२६ पर्यंत आहे.

खरीप हंगाम सन २०२५ मध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका / विकास संस्थांसाठी रू. १८,९६६.०० कोटी कर्ज वाटपाचा लक्षांक देण्यात आला होता. त्यानुसार बँका व संस्थांनी रू. १८,९६६.०० कोटी पीक कर्ज वाटप करून लक्षांक साध्य केला आहे. त्यामुळे पिक कर्ज वितरणामध्ये अडचण निर्माण झाल्याचे दिसून येत नाही. तसेच रब्बी हंगामामधील कर्ज वाटप अद्याप सुरू आहे.
(५) गटसचिवांना वेतन देण्याची प्राथमिक जबाबदारी संबंधित विकास संस्था व जिल्हा देखरेख सहकारी संस्थेची आहे.

शासनाच्या दिनांक १७/०५/२००६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील शेतक-यांना अल्पमुदतीचे पीक कर्ज ६ टक्के व्याजदराने उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून विकास संस्थांना ४ टक्के दराने व विकास संस्थेकडून सभासद शेतक-यांना ६ टक्के व्याजदराने

अल्पमुदती पीक कर्ज पुरवठा करण्यात येत आहे. यानुषंगाने विकास संस्थांना व्याजाचे उत्पन्नामध्ये २ टक्के गाळा प्राप्त होत आहे.

शासनाच्या दिनांक ०६/०९/२०१४ व दिनांक १६/११/२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार विकास संस्थांच्या सक्षमीकरणासाठी प्रतीवर्षी रू. १.५० लाखापर्यंत अनुदान देण्यात येत आहे. तसेच शासनाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये कलम ६९अ नव्याने समाविष्ट करून विकास संस्थांच्या सचिवांच्या वेतनासाठी संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत १५ पैसे दराने अंशदानाची तरतूद केली आहे.

महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांतील गटसचिवांच्या अडीअडचणी सोडविण्याच्या अनुषंगाने दिनांक १८/११/२०२५ रोजी शासन स्तरावर बैठक संपन्न झाली. बैठकीत गटसचिवांच्या अडीअडचणी सोडविण्याच्या अनुषंगाने विविध मुद्यांवर चर्चा करण्यात आली व त्यानुसार गटसचिवांच्या विविध प्रश्नांबाबत तातडीने उपाययोजना करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अशासकीय अनुदानित महाविदयालयात मंजूर जागांपैकी ११,१९८ जागा रिक्त असल्याबाबत

**(४७) १५७१३ (२९-०१-२०२६). श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अशासकिय अनुदानित महाविदयालयात मंजूर जागांपैकी ११,१९८ जागा रिक्त असल्याचे दिनांक ८ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिव्याख्यात्यांच्या एकूण मंजूर ३१,१८५ पदांपैकी ११,१९८ पदे रिक्त तर प्राचार्याच्या ११६६ पैकी ४३७ पदे तर ग्रंथपालांच्या मंजूर ११५४ पदांपैकी ३४१ पदांची भरती झाली नसल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शारिरिक शिक्षण संचालकांच्या ९६१ पैकी २९४ पदे अदयापही रिक्त असल्याचेही निदर्शनास आहे आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मंजूर पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०६-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील दिनांक ०१/१०/२०२५ रोजीची विद्यार्थी संख्या आणि परिगणीत केलेला कार्यभार विचारात घेता, एकूण १,१८० महाविद्यालयांमध्ये एकूण २६,८०३ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १८,७९९ पदे भरलेली असून एकूण ९,११० पदे रिक्त आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

दिनांक ०१/१०/२०२५ रोजीची विद्यार्थी संख्या आणि परिगणीत केलेला कार्यभार विचारात घेता सहायक प्राध्यापक संवर्गात एकूण ९,११० पदे रिक्त आहेत. तर, प्राचार्य संवर्गातील मंजूर असलेल्या ११८० पदांपैकी ७९७ पदे भरलेली असून ३८३ पदे रिक्त आहेत. तर, ग्रंथपाल संवर्गाच्या मंजूर असलेल्या १,१३३ पदांपैकी ९१२ पदे भरलेली असून २४७ पदे रिक्त आहेत.

(३) अंशत: खरे आहे.

शारीरिक शिक्षण संचालक संवर्गाची दिनांक ०१/१०/२०२५ च्या स्थितीनुसार एकूण ९१० पदे मंजूर

असून, त्यापैकी ६६४ पदे भरलेली आहेत व उर्वरित २७२ पदे रिक्त आहेत.
(४) व (५) शासन निर्णय दिनांक ११/०२/२०२६ अन्वये सहायक प्राध्यापक संवर्गातील ५,०१२ रिक्त पदांच्या पद भरतीस मंजुरी देण्यात आली असून पदभरतीची प्रक्रिया सुरू आहे.

शासन निर्णय दिनांक १२/११/२०२१ अन्वये अशासकीय अनुदानित महाविद्यालयामध्ये प्राचार्य पदभरतीसाठी मान्यता देण्यात आली आहे. तसेच, दिनांक २३/०४/२०१८ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य संवर्गाच्या पदांचा पाच वर्षाचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर रिक्त होणारी पदे भरण्यासाठी मान्यता देण्यात येते.

ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक या संवर्गात दिनांक ०१/१०/२०१७ रोजी रिक्त असलेल्या पदांची दिनांक ३/११/२०१८ व दिनांक २५/०३/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये वित्त विभागाच्या सहमतीने पदभरती करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदरची पदभरतीची कार्यवाही सुरू आहे. तसेच दिनांक ०१/१०/२०२५ रोजीच्या सुधारित विद्यार्थी संख्येच्या आधारावर रिक्त असलेल्या उर्वरित ग्रंथपाल २४७ व शारीरिक शिक्षण संचालक २७२ पदांच्या भरतीला मंजुरी देण्याचा प्रस्ताव वित्त विभागास मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. याबाबत वित्त विभागाने विचारणा केलेल्या अतिरिक्त मुद्यांच्या तपशीलासह सदर प्रस्ताव पुन्हा वित्त विभागास पाठवून वित्त विभागाच्या सहमतीने पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नेहुली (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील क्रीडा संकुलाचीझालेली दुर्दशा

**(४८) १६३५७ (२०-०२-२०२६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेहुली (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडावेत याकरिता १२ एकरात क्रीडा संकुल उभारले असून क्रीडा विभागाच्या दुर्लक्षामुळे या संकुलाची दुर्दशा झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्पर्धेसाठी येणाऱ्या खेळाडूंनाही या संकुलातील असुविधांचा त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, क्रीडा संकुलाच्या नुतनीकरणाकरीता १५ कोटींचा प्रस्ताव क्रीडा विभागाकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त प्रस्तावास मान्यता देऊन क्रीडा संकुलाची दुर्दशा दूर करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (२६-०५-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी, रायगड यांनी दिनांक ०३/१२/२०२५ रोजी रु.२२५४.९९ लक्ष किमतीचे अंदाजपत्रक क्रीडा व युवक सेवा संचालनालयास सादर केले आहे.
(४) जिल्हा नियोजन विभागाकडे संकुल दुरुस्तीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगोला (जि.सोलापूर) येथील स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेंच्या कामाबाबत**

**(४९) १६५६३ (१७-०२-२०२६). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि.सोलापूर) येथील स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेची कामे प्रगतीपथावर असून सदर योजनेसाठी सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात रु.७० कोटी इतकी तरतूद शासन अंशदानातून करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेतून अस्तरीकरण, यांत्रिकी कामे, विद्युत कामे, भूसंपादन याकरिता १५० कोटींहून अधिक निधीची आवश्यकता असून सदर योजनेचा नाबार्ड मध्ये समावेश करून निधीची तरतूद नाबार्ड अंतर्गत करण्यात येईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचा नाबार्ड मध्ये समावेश करून निधीचे वितरण नाबार्ड अंतर्गत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही,

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेकरीता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये रू.९६.४३ कोटी इतका निधी तसेच सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये रु.७५.०० कोटी तरतुद केली आहे.

(२) व (३) स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेची अस्तरीकरण यांत्रिकी कामे, विद्युत कामे, भुसंपादन याकरिता टप्याटप्याने १५० कोटीहून अधिक निधीची आवश्यकता असून, सदर योजनेचा समावेश नाबार्ड अर्थसहाय्यांतर्गत करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील शाळांमधील अभिलेख जतन करुन ठेवण्याबाबत**

**(५०) १८९४५ (२९-०१-२०२६). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील बहुतांश प्राथमिक शाळांमधून जुने अभिलेख जीर्ण झाले असून शाळा सोडल्याचा दाखला, बोनाफाईड इत्यादी दाखले मिळवण्यासाठी आदिवासी बांधवांना कसरत करावी लागते, जातीचे दाखले काढणे, बस सवलत इत्यादी सवलतींना मुकावे लागत आहे, त्यामुळे जिल्हा परिषद शिक्षण विभागाने जुने अभिलेख जतन व संवर्धन करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जनरल रजिस्टर हा शालेय अभिलेखांमधील सर्वात महत्त्वाचा अभिलेख असून रजिस्टर मध्ये आजपर्यंत शाळेत प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांची मूलभूत माहिती जसे की नाव, जन्मदिनांक, प्रवेश दिनांक, पूर्वीची शाळा, आईचे नाव, मातृभाषा, जन्म ठिकाण इत्यादी माहिती नोंदवलेली असल्याने याच रजिस्टरच्या आधारे विद्यार्थ्यांना बोनाफाईड दाखला, शाळा सोडल्याचा दाखला आणि रजिस्टर उतारा दिला जातो त्याचे व्यवस्थित जतन झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रचलित शासन निर्णयानुसार जनरल रजिस्टर मध्ये विद्यार्थ्यांची मूलभूत माहिती सोबत त्याचे स्टुडन्ट आयडी व आधार क्रमांक नोंदणी करण्याचे निर्देश दिलेले आहेत, मात्र त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन जुने अभिलेख कुचकामी झाले तरी रेकॉर्ड संवर्धन करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१७-०६-२०२६) :**(१) होय हे अंशत: खरे आहे.

वसई तालुक्यातील वातावरण दमट असून, वसई तालुक्यात २००६, २००९ व २०१४ साली पुरपरिस्थीती निर्माण झाल्याने काही शाळा पुराच्या पाण्याखाली आलेल्या होत्या अशा शाळेंचे अभिलख खराब व जीर्ण झालेले आहे. याबाबत संबधितांना अभिलेख संवर्धन करण्यासबाबत वेळोवेळी सुचना देण्यात आलेल्या आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.